# विषय


जे ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह आयोजित करीत आहे त्यांच्यासाठी 3

2022 साठी पवित्र शास्त्रभाग 4

2022 साठी विषयाची ओळख 5

ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह साहित्याची तयारी 2022 8

विश्वव्यापी उपासना सेवा

- उपासनेची तयारी करणाऱ्यांसाठी सूचना 10
- उपासनेचा क्रम 11

परिशिष्ट 17

आठ दिवसांसाठी पवित्र शास्त्र संबंधित मनन आणि प्रार्थना 25

मंडळ्यांची मध्य-पूर्व परिषद 35

ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह: 1968-2022 38

ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताहाच्या इतिहासातील प्रमुख तारखा 42



पवित्र शास्त्रभाग: येथे समाविष्ट असलेले पवित्र शास्त्रातील भाग हे The New Revised Standard Version of the Bible यामधुन घेतलेले आहेत. आवृत्ती 1989,1985. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका मधील ख्रिस्ती मंडळ्यांची ख्रिस्ती शिक्षण विभाग मंडळीपरिषद यांच्याद्वारे घेण्यात आलेले आहेत आणि परवानगीने वापरलेले आहेत. सर्व हक्क राखीव.

# जे ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह आयोजित करीत आहे त्यांच्यासाठी

## ऐक्यासाठी शोध: वर्षभर

उत्तर गोलार्ध मध्ये ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह हा 18-25 जानेवारी पारंपारिक कालावधी आहे. संत पीटर आणि संत पॉल यांच्या सणांच्या दरम्यान दिवस जोडण्यासाठी ह्या तारखा 1908 मध्ये पॉल वॉटसनने प्रस्तावित केल्या होत्या, म्हणून ह्या दिवसाला प्रतीकात्मक महत्त्व आहे. दक्षिण गोलार्धात जानेवारी हा सुट्टीचा काळ असतो तेथे प्रार्थना सप्ताह साजरा करण्यासाठी मंडळीइतर दिवस शोधतात. उदारणार्थ पेंटेकॉस्टच्या अवती-भवती (1926 मध्ये विश्वास आणि आदेश चळवळीद्वारे सुचविलेले) ही देखील मंडळीच्या ऐक्यासाठी प्रतिकात्मक तारीख आहे. लवचिकतेची गरज लक्षात घेऊन, आम्ही तुम्हाला हे साहित्य वर्षभर वापरण्यासाठी आमंत्रित करतो. जिथे मंडळया पोहोचलेल्या आहेत तेथे सहभागी तेचे प्रमाण व्यक्त करण्यासाठी आणि जे पूर्ण ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह आयोजित करीत आहे त्यांच्यासाठी एकत्रित येऊन प्रार्थना करणे जी देवाची इच्छा आहे.

## मजकूर समजून घेणे

हे साहित्य या समजुतीने दिली जाते की जेव्हा शक्य असेल तेव्हा हे स्थानिक परिस्थितीमध्ये समजून घ्यावे. स्थानिक सार्वजनिक प्रार्थना आणि भक्ती सराव हे लक्षात घेतले पाहिजे, आणि संपूर्ण सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ. जागतिक पातळीवर मंडळीचे ऐक्य साधले गेले पाहिजे. काही ठिकाणी हे साहित्य समजून घेण्यासाठी मंडळीची ऐक्यता साधनारी सरंचना आहेत आणि इतर ठिकाणी, आम्ही आशा करतो की ही सरंचना समजून घेण्याची गरज आहे. अशा प्रकारची संरचना तयार करणे प्रेरणादायक ठरेल.

## प्रार्थना सप्ताहाचे साहित्य वापरणे

- मंडळयांसाठी आणि ख्रिस्ती समाजांसाठी एका सामान्य सेवेद्वारे एकत्रित येऊन प्रार्थना सप्ताह पाळायला पाहिजे. मंडळीची ऐक्यता साधणारा भक्तीचा आदेश पुरविला गेला आहे.
- मंडळयांनी आणि ख्रिस्ती समाजांनी प्रार्थना सप्ताहाचे साहित्य त्यांच्या वैयक्तिक भक्तीमध्ये अंतर्भूत केली पाहिजे. मंडळीची ऐक्यता साधणाऱ्या सेवेतील आठ दिवस प्रार्थना, आणि अतिरिक्त प्रार्थनांची निवड योग्य रीतीने करून त्यांच्या भक्तीमध्ये समाविष्ट करू शकतात.
- जे समाज आठवड्याच्या प्रत्येक दिवशी त्यांच्या भक्तीमध्ये प्रार्थना सप्ताह पाळतात. ते आठ दिवसीय प्रार्थना सप्ताह मधून भक्तीसाठी हे साहित्य घेऊ शकतात.
- ज्यांना प्रार्थना सप्ताहाच्या विषयावर पवित्र शास्त्राचा अभ्यास घेण्याची इच्छा असेल ते आठ दिवसांमध्ये दिलेले पवित्र शास्त्रातील मनन आणि शास्त्रभाग वापरू शकतात. प्रत्येक दिवशी तुम्ही केलेली चर्चा ही मध्यस्थीच्या प्रार्थनेने शेवट करू शकता.
- जे एकांतात प्रार्थना करू इच्छितात त्यांच्यासाठी हे साहित्य उपयुक्त वाटू शकते. ते लक्षात घेऊ शकतात की ते इतरांच्या संपर्कात आहेत ख्रिस्ताच्या मंडळींच्या अधिक दृश्यमान ऐक्यतेसाठी पूर्ण जगभरात प्रयत्न सुरू आहेत.

# 2022 साठी पवित्र शास्त्रभाग

मत्तय 2:1-12

हेरोद राजाच्या काळात यहुदीयातील बेथलेहेमात येशूच्या जन्मानंतर, पाहा, पूर्वेकडून मागी लोक येऊन विचारपूस करू लागले की, यहूद्यांचा राजा जन्मास आला तो कुठे आहे? कारण आम्ही पूर्व दिशेस तारा पाहून त्याला नमन करावयास आलो आहों. हेरोद राजाने हे ऐकले तेव्हा तो व त्याच्याबरोबर सर्व येरुशलेम घाबरून गेले; आणि त्यांने प्रजेचे सर्व मुख्य याजक व शास्त्री यांना जमवून विचारले की, ख्रिस्ताचा जन्म कोठे व्हावयाचा आहे? ते त्याला म्हणाले, यहूदियातील बेथलेहेमात; कारण संदेष्टयाच्या द्वारे असे लिहिले आहे की,

हे यहूद्याच्या प्रांता, "बेथलेहेमा, तू यहूदाच्या सर्व
सरदारांमध्ये कनिष्ठ आहेस असे मुळीच नाही,
कारण माझ्या इस्राएल लोकांचा प्रतिपाळ करील
असा सरदार तुझ्यातून निघेल.

तेव्हा हेरोदाने मागी लोकांना गुप्तपणे बोलावून त्यांच्यापासून तारा दिसू लागल्याची वेळ नीट विचारून घेतली आणि त्यांना बेथेलेहेमास पाठविताना म्हटले, तुम्ही जाऊन त्या बाळकाविषयी बारकाईने विचारपूस करा, व तुम्हाला शोध लागल्यावर मला कळवा म्हणजे मीहि येऊन त्याला नमन करीन. राजाचे हे सांगणे ऐकून ते निघाले आणि पाहा, जो तारा त्यांनी पूर्व दिशेस पाहिला होता तो, जेथें तो बाळक होता, त्या जागेच्या वर जाऊन थांबेपर्यंत त्यांच्या पुढे चालला. तो तारा पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. नंतर ते त्या घरांत गेले. तेव्हा तो बाळक आपली आई मरिया हिच्याजवळ असलेला त्यांनी पाहिला व पाया पडून त्यांनी त्याला नमन केले आणि आपल्या द्रव्याच्या थैल्या सोडून 'सोने, ऊद व गंधरस' हि दाने त्याला अर्पिली. मग हेरोदाकडे परत जाऊन नका, अशी स्वप्नात सूचना मिळाल्यामुळे ते दुसऱ्या मार्गाने आपल्या देशास निघून गेले.

New Revised Standard Version

# 2022 साठी विषयाची ओळख

आम्ही पूर्व दिशेस तारा पाहून
त्याला नमन करावयास आलो आहों.
(मत्तय 2:2)

मत्तयकृत शुभवर्तमान अनुसार, यहूदाच्या आकाशात ताऱ्याचे स्वरूप हे आशेच्या दीर्घ प्रतिक्षित चिन्हाचे प्रतिनिधित्व करते, ज्या ठिकाणी खरा राजा आणि तारणहार प्रकट झालेला आहे त्या ठिकाणी मागी लोकांना घेऊन जातो आणि खरंच पृथ्वीवरील सर्व लोकांना घेऊन जातो. हा तारा ही एक भेट आहे, सर्व मानवजातीसाठी देवाच्या प्रेमळ उपस्थितीचे संकेत आहे. हा तारा मागी लोकांना राजा जन्माला आल्याचे चिन्ह होते. त्याच्या किरणांसह तो मानवजातीला एका मोठ्या प्रकाशाकडे घेऊन जातो, येशु, नवीन प्रकाश जो प्रत्येक व्यक्तीला प्रकाश देतो आणि जो आपल्याला पिताच्या गौरवाकडे आणि त्याच्या तेजाकडे घेऊन जातो. येशू हा प्रकाश आहे, जो जेव्हा आपण अंधकारामध्ये होतो तेव्हा तो आपल्यामध्ये आलेला आहे. कुमारी मरियाच्या पोटी पवित्र आत्म्याने जन्मास आला आणि मानव बनला. येशू हा प्रकाश आहे जो जगाच्या अंधारात आणखी पुढे गेला आणि आमच्या तारणासाठी आणि आमच्यासाठी, त्याने स्वतःला रिक्त केले आणि मृत्यूपर्यंत आज्ञाधारक राहीला. पित्याकडे जाण्याचा आमचा मार्ग उजळून निघावा म्हणून त्याने हे केले जेणेकरून आपण पित्याला ओळखावे आणि त्याचे आपल्यावर असलेले प्रेम ओळखावे, ज्याने आपणा करिता स्वतःचा एकुलता एक पुत्र दिला जेणेकरून आपण त्याच्यावर विश्वास ठेवून, आपला नाश होऊ नये तर सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

मागी लोकांनी तारा पाहिला आणि ते त्याच्या मागे गेले.  पारंपारिक भाष्यकारांनी मागी लोकांचे असे चित्र बघितले की त्यावेळी ज्ञात असलेल्या लोकांच्या विविधतेचे प्रतीक, आणि दैवी पाचारणाचे सार्वत्रिक चिन्ह जे पूर्वेकडील ताऱ्याच्या प्रकाशात दिसते. ते बघतात की नवजात राजाच्या शोधामध्ये मागी लोकांची उत्सुकता देखील दिसते, सर्व मानवजातीसाठी सत्याची, चांगुलपणाची आणि सौंदर्याची भूक दिसते. जगाच्या निर्मितीपासून मानवजाती देवाला आदर देण्यासाठी तळमळत आहे. जसा तारा दिसायला लागला तसा दैवी मुलाचा जन्म वेळेच्या पूर्णतेत झाला. देवाच्या बहुप्रतीक्षित तारणाची घोषणा झाली जी जन्माच्या रहस्याने सुरुवात होते.

आपल्याला मागी लोक देवाला इच्छित असलेल्या सर्व राष्ट्रांची एकता प्रकट करतात. ते दूर देशा वरून प्रवास करितात आणि विविध संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात, तरी देखील ते नवजात राजाला ओळखण्यासाठी आणि पाहण्यासाठी समान भूकने जातात आणि बेथलेहेम मधील एका छोट्या घरामध्ये, त्याला आदर व भेट देण्यासाठी ते एकत्रित आले. देवाच्या जगासाठी त्याला हवे असलेले ऐक्य घडवून आणण्यासाठी ख्रिस्ती लोकांना चिन्ह म्हणून बोलाविण्यात आलेले आहे. भिन्न संस्कृती, वंश आणि भाषेमधून आलेले, ख्रिस्ती लोक ख्रिस्तासाठी साधारण शोधात आणि त्याची साधारण इच्छेने उपासना करण्यासाठी सामायिक होतात. म्हणून ख्रिस्ती लोकांचे ध्येय आहे की आपण ताऱ्यासारखे चिन्ह व्हावे, मानवजातीची देवाला भेटण्याची भूक भागवावी, सर्वांना ख्रिस्ताकडे घेऊन जावे, आणि देव सर्व लोकांची एकता घडवून आणत आहे त्यासाठी कारण व्हावे.

मागी लोकांचा आदर याचा एक भाग म्हणजे त्यांचा खजिना उघडणे व त्याला भेट वस्तू देणे, ख्रिस्ती प्राचीन काळापासून, ख्रिस्ताच्या ओळखीचे विविध पैलू म्हणून चिन्ह असे समजले आहे: सोनं राजपदासाठी, ऊद त्याच्या देवत्वासाठी आणि गंधरस त्याच्या मृत्यूचे पूर्वदर्शन करते. म्हणून विविध भेटवस्तू आम्हाला विशिष्ट अंतर्दृष्टीची प्रतिमा प्रदान करतात ज्या, विभिन्न ख्रिस्ती परंपरांमध्ये येशुचे कार्य आणि व्यक्ती विषयी आहे. जेव्हा ख्रिस्ती लोक एकत्र येतात आणि ख्रिस्ताला आदर म्हणून आपला खजिना आणि आपले अंतकरणं उघडतात, या अंतर्दृष्टीच्या भेटवस्तू सामायिक झाल्यामुळे सर्व समृद्ध झाले आहेत.

तारा पूर्वेला उगविला (मत्तय 2:2). पुर्वेकडून सूर्य उगवतो, आणि देवाच्या दयेने आपल्याला तारण प्रगट झालेले आहे ज्याने आपल्याला वरून आशीर्वादित केलेले आहे (लूक 1:78) असे मध्य पूर्वीय लोक समजतात. परंतु मध्य पूर्वेचा इतिहास असा होता आणि अजूनही असा आहे, भांडण आणि कलहाने दर्शविला आहे, रक्ताने डागाळलेला आणि

अन्यायाने आणि जुलूमाने अंधारलेला आहे. अगदी अलीकडे, पलिस्तीनी नकबापासून (1948 च्या युद्धादरम्यान पलिस्तीनी अरब निर्गमन झालेली लोकसंख्या) या देशाने रक्तरंजित युद्धाची मालिका, क्रांती आणि धार्मिक अतिरेकी उदय पाहिलेला आहे. मागी लोकांच्या गोष्टींमध्ये देखील अनेक गडद घटकाचा समावेश आहे, विशेषता, बेथलेहेमात व आसपासच्या सर्व प्रदेशात दोन वर्षांचे व त्याहून कमी वयाचे बाळक आहे, त्यांना मारावे असे जुलूमी आदेश हेरोद देतो. (मत्तय 2:16-18). यातील क्रूरता मध्य पूर्वेचा दीर्घ इतिहास आणि कठीण वर्तमानाशी प्रतिध्वनी करतात.

मध्य पूर्व मध्ये देवाच्या वचनाने मूळ धरले आणि फळ दिले: तीसपट, साठपट आणि शंभरपट. आणि या पूर्वेकडूनचं प्रेषित पृथ्वीच्या टोकापर्यंत शुभवर्तमान सांगण्यासाठी निघाले (प्रेषितांची कृत्ये 1:8). मध्यपूर्वने हजारो ख्रिस्ती साक्ष आणि हजारो ख्रिस्ती शहीद दिलेत. आणि अजूनही लहान ख्रिस्ती समूहाचे अस्तित्व धोक्यात आले आहे आणि अनेकांना सुरक्षित ठिकाण आणि शांत जीवन शोधण्यासाठी प्रेरित केले जात आहे. प्रकाशा सारखा जसा येशू बाळ आहे. या कठीण काळात मध्य-पूर्व ख्रिस्ती धर्माच्या प्रकाशाला धोका निर्माण झालेला आहे.

ख्रिस्ती लोकांसाठी यरुशलेम हे एक शक्तिशाली प्रतीक आहे कारण ते शांततेचे शहर आहे, ज्या ठिकाणी सर्व मानवजातीचा उद्धार झाला आणि सुटका झाली. परंतु आज शहरामध्ये शांतता हरवली आहे. विविध पक्ष त्यावर आपला दावा करतात आणि इतरांकडे दुर्लक्ष करतात. यरुशलेम मधील प्रार्थना देखील राजकीय आणि लष्करच्या अधीन झालेली आहे. यरुशलेम हे राजांचे शहर होते. खरंच ज्या शहरात येशू विजयाने प्रवेश करतो, राजा म्हणून गौरविल्या जाते. (लूक 19:28-44). साहजिकच, राजकीय शहरांमध्ये ताऱ्याने प्रकट केलेला नवजात राजा सापडेल अशी मागी लोकांनी अपेक्षा केली होती. तथापि, कहाणी सांगते की तारणाऱ्या या राजाच्या जन्माने आशीर्वादित झाल्यापेक्षा, आजच्यासारखे पूर्ण यरुशलेम शहर गोंधळून गेलेले होते.

आज पूर्वीपेक्षा जास्त, मध्य पूर्वेला त्यातील लोकांसाठी स्वर्गीय प्रकाशाची गरज आहे. बेथलेहेम मधील तारा हे चिन्ह आहे की देव त्याच्या लोकांसोबत चालतो, त्यांच्या वेदना जाणतो, त्यांचे रडणे ऐकतो आणि त्यांना कळवळा दाखवितो. हे आम्हाला आश्वस्त करिते की जरी परिस्थिती बदलली आणि भयानक संकटे आलीत, तरीदेखील देवाचा विश्वासूपणा अटळ आहे. प्रभू झोपत नाही आणि डुलकी ही घेत नाही. तो त्याच्या लोकांच्या बाजूने चालतो आणि जेव्हा ते हरवले आहेत किंवा धोक्यामध्ये आहेत तेव्हा तो त्यांना परत आणतो. विश्वासाचा प्रवास म्हणजे देवा सोबत चालणे होय, जो नेहमी त्याच्या लोकांवर लक्ष ठेवतो आणि जो आपल्याला इतिहासाच्या आणि जीवनाच्या जटिल मार्गावर मार्गदर्शन करतो.

या प्रार्थना सप्ताहासाठी, मध्यपूर्व ख्रिस्ती लोकांनी तारा हे ध्येय निवडले जो बऱ्याच कारणांसाठी पूर्व दिशेस उगविला. अनेक पाश्चात्य ख्रिस्ती लोक नाताळ साजरा करीतात, अधिक प्राचीन मेजवानी, आणि अजूनही पाश्चात्य ख्रिस्ती लोकांच्या मेजवानीचे तत्व हे आहे की बेथलेहेम आणि यार्देन मधील राष्ट्रांमध्ये जेव्हा देवाचे तारण प्रकट झाले. हा केंद्रबिंदू प्रकटीकरणा वर आहे, याचा अर्थ, एक खजिना जो मध्य पूर्व भागातील ख्रिस्ती व्यक्ती जगातील इतर भाऊ आणि बहिणींना देऊ शकतात.

तारा मागी लोकांना यरूशलेम मधील सर्व कलहातून घेऊन जातो, जिथे निष्पाप लोकांचा जीव घेण्याचा हेरोदाने कट रचला होता. आज अजूनही, आणि जगाच्या विविध भागात, निरपराधांना हिंसाराची धमकी आणि हिंसाचार सहन करावा लागत आहे, आणि तरुण कुटुंबे हेरोद आणि आगस्टस सारख्या अत्याचारी लोकांपासून पळून जातात. यासंदर्भात लोग देव त्यांच्या पाठीशी असल्याचे चिन्ह शोधतात. ते नवजात राजाला शोधतात, सौम्यतेचा, शांतीचा आणि प्रेमाचा राजा. परंतु त्याच्याकडे जाण्याच्या मार्गाकडे नेणारा तारा कुठे आहे? ख्रिस्ताकडे घेऊन जाणाऱ्या प्रकाशाचा तारा बनणे हे ख्रिस्ती मंडळयांचे ध्येय आहे, जो जगाचा प्रकाश आहे. असा तारा बनून मंडळी हे जीवनातील त्यांच्या समस्यांना साथ देऊन जगाच्या अडचणीमध्ये एक आशेचा चिन्ह बनते आणि त्याच्या लोकांसाठी देवाच्या उपस्थितीचे चिन्ह बनते. शब्दाने आणि कृतीने मार्ग दाखवण्यासाठी ख्रिस्ती लोकांना पाचारण्यात आलेले आहे जेणेकरून राष्ट्राला ख्रिस्त पुन्हा एकदा प्रकट होईल. परंतु आमच्यामध्ये असलेली विभाजने ख्रिस्त साक्षीचा प्रकाश मंद करतात आणि मार्ग अस्पष्ट करतात, लोकांचा ख्रिस्ताकडे जाण्याचा मार्ग प्रतिबंधित करतात. याउलट ख्रिस्ती लोक ख्रिस्ताची उपासना करण्यासाठी एकत्र येतात आणि भेटवस्तूंची देवाण-घेवाण करून आपला खजिना उघडतात, ऐक्यतेसाठी चिन्ह बनतात, जी देवाची इच्छा त्याच्या निर्मितीसाठी आहे.

मध्यपूर्व ख्रिस्ती लोक ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताहासाठी हे संसाधने देतात आणि हे जागृत करतात की जग अनेक त्रास आणि अडचणी, जे ते अनुभवतात ते सामाईक करतात. जो अंधकारावर जय मिळवू शकतो त्या तारणकर्त्याकडे जाण्यासाठी प्रकाशाची आस बाळगतात. कोविड-19, जागतिक महामारी, आगामी आर्थिक संकट, आणि राजकीय, आर्थिक आणि सामाजिक संरचनाचे अपयश, सर्वात कमकुवत आणि असुरक्षित लोकांचं रक्षण करण्यासाठी, अंधारात प्रकाशाची जागतिक गरज अधोरेखित केलेली आहे. दोन हजार वर्षांपूर्वी मध्य पूर्व मध्ये, पूर्वेला चमकलेला तारा, आजही आपल्याला त्या गोठ्याकडे बोलावीत आहे, जिथे ख्रिस्त जन्मलेला आहे. जिथे देवाचा आत्मा जिवंत आणि सक्रिय आहे, आपल्या बाप्तिस्माच्या वास्तविकतेसाठी आणि आपल्या अंतःकरणाच्या परिवर्तनासाठी त्याकडे आकर्षित करीत आहे.

तारणकर्त्याला भेटल्यानंतर आणि त्याची सर्व मिळून उपासना केल्यानंतर, मागी लोक त्यांच्या देशात वेगळ्या मार्गाने परत जातात, त्यांना स्वप्नांमध्ये सावध केले होते. त्याचप्रमाणे, जेव्हा आम्ही आमच्या प्रार्थनेमध्ये सहभागिता सामायिक करतो तेव्हा आमच्या जीवनाकडे परत येण्यासाठी, आमच्या मंडळीकडे परत येण्यासाठी आणि आपल्या जगात नवीन मार्गाने जाण्यासाठी प्रेरणा दिली पाहिजे. नवीन मार्गाने प्रवास करणे म्हणजे आपल्या मंडळीमध्ये आणि समाजामध्ये, पश्चातापासाठी आमंत्रण आहे आणि आपल्या जीवनाचे नवीनीकरण आहे. ख्रिस्ताचे अनुसरण करणे हा आपला नवीन मार्ग आहे. बदलत्या आणि अस्थिर जगामध्ये ख्रिस्ती लोकांनी स्थिर राहायला पाहिजे. नक्षत्र आणि चमकणारे ग्रह निर्धारित केले पाहिजे, परंतु प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये याचा काय अर्थ आहे? आज शुभवर्तमानाची सेवा करण्यासाठी, मानवाची प्रतिष्ठा राखण्यासाठी, विशेषतः गरीब, दुर्बल आणि उपेक्षित लोकांमध्ये समर्पणाची आवश्यकता आहे. जगाशी आणि एकमेकांशी व्यवहार करताना मंडळीची पारदर्शकता आणि जबाबदारी आवश्यक आहे. याचा अर्थ पीडितांना दिलासा देण्यासाठी मंडळींनी सहकार्य करणे आवश्यक आहे, स्थानांतरीत लोकांचे स्वागत करणे, ओझ्यांपासून मुक्त करणे आणि न्याय आणि प्रामाणिक समाज निर्माण करणे आहे. मंडळीने एकत्रित येऊन काम करणे हे, पाचारण आहे जेणेकरून तरुण लोकांनी देवाच्या अंतकरणाशी सहमत होऊन आपले भविष्य घडवू शकतात, असे भविष्य ज्यामध्ये सर्व मानवजाती जीवन, शांतता, न्याय आणि प्रेम अनुभवू शकतात. मंडळी मधील नवीन मार्ग हा दृश्य एकतेचा मार्ग आहे की त्यागपूर्ण धाडसाने शोधू शकतो जेणेकरून दिवसेंदिवस देव सर्वकाही मध्ये देव असो (1 करिंथकरास पत्र 15:28).

# ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह साहित्याची तयारी 2022

ख्रिस्ती ऐक्यता आणि विश्वास स्थापन करण्यासाठी, मंडळयांची जागतिक परिषदेच्या आदेश आयोगाने पॉन्टीफिकल परिषदेने आंतरराष्ट्रीय गटाला संयुक्तपणे नियुक्त केले. ख्रिस्ती ऐक्यता प्रार्थना सप्ताहासाठी मजकूर तयार करण्यासाठी सध्याच्या महामारीमुळे समोरासमोर भेटणे शक्य नव्हते म्हणून यावर दुरुस्थपणे काम करावे लागले.

विषय निवडण्यासाठी आणि 2022 च्या प्रार्थना सप्ताहसाठी मसुदा तयार करण्यासाठी, पीसीपीसीयु ने बेरत, लेबनॉन येथील मंडळयांना मध्यपूर्व परिषदेला सोपविले होते. त्यांनी विषय निवडला, "आम्ही पूर्वेस तारा पाहून त्याला नमन करावयास आलेलो आहे. (मत्तय 2:2). नेहमीपेक्षा जास्त, या कठीण काळात, आम्हाला अंधारात चमकणाऱ्या प्रकाशाची गरज आहे तो प्रकाश, ख्रिस्ती लोकांनी घोषित केलेला, तो ख्रिस्तामध्ये प्रकट झालेला आहे.

जगाच्या अशा प्रदेशात जिथे मानवी हक्क नेहमी राजकीय आणि आर्थिक फायद्यांमुळे पायदळी तुडवले जातात, 4 ऑगस्ट 2020 रोजी बेरतला उद्ध्वस्त करणाऱ्या स्फोटामुळे अभूतपूर्व आंतरराष्ट्रीय आरोग्य संकट आणि गंभीर मानवी आणि भौतिक परिणाम सहन करावा लागला. स्थानिक जागतिक गटाने ऑनलाईन बैठकीमध्ये सहभागी होऊन आपल्या कामाचे परिणाम सादर करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो आणि प्रार्थना करतो की मध्य-पूर्व ख्रिस्ती लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात एकता वाढावी आणि आमच्या काळात आणि येणाऱ्या काळात सर्व पुरुषांनी आणि स्त्रियांनी प्रतिष्ठित, न्याय आणि शांततापूर्ण जीवन जगण्यासाठी जगातील लोकांनी योगदान द्यावे.

**आंतरराष्ट्रीय संघातील सहभागी**

| | |
|---|---|
| रेव्ह. फादर मार्टिन ब्राउन, ओएसबी | ग्लेनस्टल अॅबे (आयर्लंड) |
| Ms.अॅन-नोएल क्लेमेंट | युनाइट चरेटीएनन (फ्रान्स) |
| रेव्ह. अँथनी करर | पोंटिफिकल काउंसिल फोर प्रोमोटींग ख्रिश्चन युनिटी (व्हॅटिकन) |
| डॉ आणी गजरियां द्रिसी | विश्वास आणि आदेश सचिवालयचा कार्यक्रम अधिकारी वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्च (स्विझ्झर्लंड) येथे |
| डॉ जोचेन वॅगनर | अरबेटगेमेंन्सचाफ्ट ख्रिस्तलीचेर इन दऊत्सचलंड (जर्मनी) |
| डॉ हॅने लँपार्टर | जर्मन लुथेरन चर्च (जर्मनी) |
| लेटिसिया कँडेलरियो लोपेझ | व्हर्बम देई मिशनरी फ्रेटरनिटी (सिंगापूर) |
| रेव्ह. डॉ ओडायर पेड्रोसो माटेस | डायरेक्टर ऑफ फेथ अँड ऑर्डर - WCC (स्विझ्झर्लंड) |
| रेव्ह. फादर जेम्स पुगलीसी, एसए | फ्रिअर ऑफ द अ्टोन्मेंट, सेंट्रो प्रो युनिओन (इटली/यूएसए) |
| रेव्ह. डॉ मिकी रॉबर्ट्स | अध्यात्मिक जीवनासाठी कार्यक्रम कार्यकारी – WCC (स्विझ्झर्लंड) |
| डॉ क्लेअर वॅटकिन्स | रोहेम्प्टन विद्यापीठ (इंग्लंड) |

**मंडळयांची पूर्व-मध्य परिषद मधील सहभागी**

| | |
|---|---|
| रेव्ह. फादर डॉ बुलोस वेहबे | ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्च ऑफ अँटिओक (लेबनॉन) |
| रेव्ह. डॉ रिमा नसराल्लाह | इव्हँजेलिकल नॅशनल चर्च (लेबनॉन) |
| रेव्ह. फादर डॉ रॉजर अखरास | सिरियाक ऑर्थोडॉक्स चर्च ऑफ अँटिओक (सीरिया) |
| डॉ जॉन डॅनियल | इव्हँजेलिकल सिनोड ऑफ द नाईल (इजिप्त) |
| एमिली टॅनस | मॅरोनाइट चर्च (लेबनॉन) |
| रेव्ह. फादर गॅब्रिएल हॅकेम | ग्रीक मेलकैट कॅथोलिक चर्च ऑफ एन्टीवो (लेबनॉन) |

# विश्वव्यापी उपासना सेवा

## उपासनेची तयारी करणाऱ्यांसाठी सूचना

ख्रिस्ती ऐक्याच्या प्रार्थना सप्ताहाच्या दरम्यान, बऱ्याच वेगवेगळ्या परंपरे मधून आणि कबुलीजबाब देण्यासाठी जगातील ख्रिस्ती लोक मंडळयांच्या ऐक्यतेसाठी प्रार्थना करण्यासाठी एकत्रित येतात. मंडळयांची मध्यपूर्व परिषदेने या वर्षाचे साहित्य आणि उपासना सेवा तयार केलेली आहे. मागी लोक नवजात राजाला भेटण्यासाठी जातात या प्रेरणेने शास्त्रभागाची आणि धार्मिक मजकूराची निवड केलेली आहे, मत्तय 2:1-12 मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, विशेषकरून वचन 2: "आम्ही पूर्वेस तारा पाहून त्याला नमन करावयास आलेलो आहो."

काहींनी सुचविलेले संगीत परिशिष्टात जोडलेले आहे. जर मध्यपूर्वेतील ख्रिस्ती लोक मंडळी उपस्थित आहेत, तर मी त्यांना त्यांच्याच भाषेमधून काही गीताचे नेतृत्व करण्यासाठी आमंत्रित करणे इष्ट वाटेल. डिजिटलचा वापर झाल्यापासून अलीकडच्या वर्षात उपासनेसाठी संसाधने वाढली आहेत. काही संगीतच्या ऑनलाइन व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या लिंक्स देखील परिशिष्टात समाविष्ट केलेले आहे. तुमच्या स्थानिक संदर्भावर अवलंबून, या वर्षाच्या विषयावर प्रकाश टाकणारी योग्य गिते टाकून तुम्ही बदल करू शकता.

"ख्रिस्ताचा प्रकाश सामायिक करणे" या विषयाला धरून बऱ्याच गोष्टी तयार केल्या पाहिजेत. प्रथम, एक गडद निळ्या रंगाचा कापडाचा तुकडा रात्रीचा प्रकाश जागृत करण्यासाठी टांगला पाहिजे. दुसरे, त्या कपड्यावर एक मोठा तारा टांगावा. तिसरे, उपासना करणाऱ्यांसाठी कागदाचे लहान तारे लावावे. संदर्भाच्या आधारावर, जे सर्व उपस्थित आहेत त्या सर्वांनी एक एक तारा घ्यावा आणि त्या कपड्यावर म्हणजे "आकाश" वर स्वर्गीय राजाला अर्पण म्हणून लावावा. पर्यायाने, विविध गटाच्या आणि उपासनेमध्ये सहभागी झालेल्या लोकांच्या वतीने असे करण्यासाठी प्रतिनिधी निवडू शकता.

सेवेचा भाग वाचकाला सोपवून द्यावा जेणेकरून तो इतर विविध वाचकांमध्ये सामायिक करू शकतो. त्याचप्रमाणे, शास्त्रभाग पुढाऱ्याला सोपवून द्यावा जेणेकरून तो इतर पाळकांना किंवा पुढाऱ्यांना जे विविध परंपरेमधून आणि समाजामधून उपासनेसाठी सहभागी झालेले आहेत त्यांच्यामध्ये सामायिक करू शकतात. हे सर्व पुढारी एकत्रित पाठवणे आणि आशीर्वाद घोषित करू शकतात.

# उपासनेचा क्रम

पुढारी

वाचक

मंडळी

**सुरुवात**

***जेव्हा गीत वाजवल्या किंवा गायल्या जाईल तेव्हा पाळकआणि इतर सहभागी मिरवणुकीमध्ये प्रवेश करतात.***

**उपासनेसाठी बोलाविणे**

**पुढारी**: पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावांमध्ये

**मंडळी**: आमेन

**पुढारी**: भावांनो आणि बहिणींनो, आज आपण जगाच्या चारही कोपऱ्यामधून सहविश्वासण्याऱ्यांसोबत मंडळीच्या दृश्य ऐक्यतेसाठी प्रार्थना करण्यासाठी एकत्रित आलेलो आहोत. मंडळयांची मध्यपूर्व परिषदेने तयार केलेली उपासना संसाधने याद्वारे आम्ही हे करतो. आमचा शास्त्रभाग हा मागी लोक नवजात राजाला भेटण्यासाठी गेलेत त्यापासून प्रेरित आहे. संत मत्तयकृत शुभवर्तमानमध्ये वर्णन केल्याप्रमाणे, "आम्ही पूर्वेस तारा पाहून त्याला नमन करावयास आले आहो" आम्ही आमचे लक्ष पूर्वेस दिसलेल्या त्या ताऱ्याकडे केंद्रित करू या आणि त्या ताऱ्याला आमचे नेतृत्व करू द्या.

आपण सर्वजण धन्यवाद देऊन आणि आनंदाने, व आजारी व्यक्ती घेऊन, दुःखी, उपेक्षित, निर्वासित आणि त्याच्यासमोर न मुळावलेले, आपला अंधार देव त्याच्या प्रकाशाने दूर करू शकतो हे जाणून देवाच्या उपस्थितीमध्ये येऊ या. जेव्हा आज आपण मंडळीच्या ऐक्यतेसाठी प्रार्थना करू, आम्ही आणि आमचा समाज देखील प्रकाश असु या, जो येशू तारणाऱ्या देवाकडे घेऊन जाईल.

**पुढारी**: सर्वशक्तीमान पिता, तुझे गौरव असो, कारण तू तुझ्या निर्मितीच्या द्वारे स्वतःला प्रकट केलेले आहे आणि सर्व लोकांना तुझ्या उपस्थितीमध्ये उभे राहण्यासाठी आमंत्रित केले आहे. आम्ही आमच्या जीवनामध्ये येशूचा तारा बघितलेला आहे आणि जसे मागी लोक आलेत तसेच आम्ही तुझी उपासना करण्यासाठी आलेले आहोत. आज आम्ही स्वतःला अर्पण करतो आणि आमच्यामध्ये पवित्र आत्म्याची उपस्थिती मागतो.

**मंडळी**: हे स्वर्गीय राजा, आम्ही पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून, उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून, तरुण आणि वृद्ध, पुरुष आणि स्त्रिया, तुला नमन करण्यासाठी आणि अर्पण करण्यासाठी आलो आहोत म्हणून आम्हाला एकमेकांसोबत एकत्र कर. आमेन.

गीत

पृष्ठ क्र. 1

---

सूचनांसाठी परिशिष्ट पहा पृष्ठ क्र. 17

## स्तुती आणि कबुलीजबाबची प्रार्थना

**पुढारी:** हे प्रभू, स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्या, आम्ही तुझे गौरव करतो, कारण तू आकाशाच्या तिजोरीमध्ये दिवे लावलेले आहेत. तू प्रकाशाला अंधारापासून वेगळे केलेले आहे. दिवस आणि वर्ष आणि पवित्र समय चिन्हांकित केलेले आहे. तू आकाश ताऱ्यांनी जडविलेले आहे. तुझी कृत्ये किती भव्य आहेत. आकाश देवाचा महिमा वर्णिते आणि अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शविते.

**मंडळी:** हे प्रभू, आम्ही तुझे गौरव करतो.

**पुढारी:** आम्ही तुझी स्तुती करतो कारण आमच्या बंडखोरी नंतरही तू आम्हाला सोडले नाहीस. आमच्या तारणासाठी, आमचा प्रकाश होण्यासाठी आणि आमच्या अंधार दूर होण्यासाठी तू तुझ्या पुत्राला आमच्यासाठी पाठविले. त्याच्यामध्ये जीवन होते आणि ते जीवन सर्व मानव जातीचा प्रकाश होता आणि तो प्रकाश अंधारात चमकतो.

**मंडळी:** हे प्रभू, आम्ही तुझी स्तुती करतो.

**पुढारी:** हे प्रभू, आम्ही तुझी उपासना करतो कारण तुझ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या द्वारे आमच्या कठीण परिस्थितीच्या वेळेस तू साथ देतोस. असत्य आणि शंकाच्या या जगामध्ये तू आमचे मार्ग उजाळतोस आणि ज्ञान आणि विश्वास देतो.

**मंडळी:** हे प्रभू, आम्ही तुझी उपासना करतो.

**पुढारी:** हे प्रभू, आम्ही तुझे आभार मानतो कारण तू आम्हाला या जगात हा प्रकाश प्रतिबिंबित करण्यासाठी पाठविलेले आहे. विविध मंडळयांमध्ये आणि विविध संस्कृतीमध्ये आणि येशूची साक्ष देण्यासाठी, जो खरा राजा आहे, त्याला आम्ही स्वतःला अर्पण करीतो.

**मंडळी:** हे प्रभू, आम्ही तुझे आभार मानतो.

**पुढारी:** सर्व लोक तुझी उपासना आणि तुला नमन करो. आम्ही अंधकाराला अनेकदा प्राधान्य दिले परंतु आम्हाला प्रकाश दिला म्हणून आम्ही आमच्या पापाच्या कबुलीसाठी तुझ्याकडे येत आहो.

**मंडळी:** आम्ही तुझ्यासमोर कबूल करतो की आम्ही तुझ्या मार्गापासून दूर गेलो होतो आणि तुझ्या नियमांचे उल्लंघन केले आम्ही तुझी चांगली निर्मिती विद्रूप केली आणि आमच्या उपभोगाद्वारे तुझी संसाधने वाया घालवली. आम्ही **तुझ्या** समुद्र आणि नद्या प्रदूषित केल्या आणि तुझी माती आणि हवा विषारी केली आणि अनेक प्रजाती नष्ट होण्यास हातभार लावला.

(शांतता)

**मंडळी:** आम्ही आमच्या भावांसोबत आणि बहिणींसोबत स्वार्थतेने वागलो. आमच्या न्यायाच्या वचनपद्धतीवर विजय मिळवण्यासाठी आम्ही आमच्या इच्छा आणि गरजाला परवानगी दिली. आम्ही आमच्यामध्ये भिंती बांधल्या आणि इतरांसोबत अविश्वासाची बीजें रोपलेली आहेत.

(शांतता)

**मंडळी:** आम्ही वंश, धर्म आणि लिंगाच्या आधारावर लोकांना वेगळे केले आहे आणि आम्ही आमच्या सर्व युद्धात येशूला आमच्या बाजूने घोषित केलेले आहे. हे प्रभू, आम्ही पश्चाताप करून तुझ्यासमोर येतो, आमच्या या सर्व विचारांची आणि कृत्यांची क्षमा कर.

(शांतता)

**मंडळी:** सर्वशक्तिमान देवा, आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचे पित्या, सर्व लोकांची सुटका होण्यासाठी तू त्याला वेळेच्या पूर्णतेत पाठविले आहे, आमच्यावर कृपा कर, आमच्या पापाची क्षमा कर आणि गौरवी स्वरूपात आमचे परिवर्तन कर जेणेकरून आम्ही या संकटग्रस्त जगात आशेचा किरण म्हणून चमकू शकु.

(शांतता)

**पुढारी:** सर्वशक्तिमान देव, आमच्या प्रार्थना ऐकतो, आमच्यावर कृपा करतो आणि आमच्या पापांची क्षमा करतो.

**मंडळी:** आम्ही आमच्या सर्व सुरांनी त्याची स्तुती करतो, देवाला धन्यवाद असो.

गीत

पवित्र देवा!

पवित्र पराक्रमी!

पवित्र अनंतकाळ असणारा, आमच्यावर दया कर!

**स्तोत्रसंहिता 8** (प्रतिसादपूर्वक)

**वाचक:** हे परमेश्वरा, आमच्या प्रभू, सर्व पृथ्वीवर तुझे नाव किती थोर आहे! तू आपले वैभव आकाशभर पसरिले आहे.

**मंडळी:** तू बाळकें व तान्हुली यांच्या मुखाने सामर्थ्य स्थापित केले आहे; तुला विरोधी आहेत म्हणून आणि सूड **घेणारायांना** कुंठित करावे म्हणून तू असे केले आहे.

**वाचक:** आकाश जे तुझे अंगुलीकार्य, व त्यात तु नेमलेले चंद्र व तारे ह्यांच्याकडे पहावे तर

**मंडळी**: मर्त्य मनुष्य तो काय की तु त्याची आठवण करावी? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावे?

**वाचक:** तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहे; त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकटमंडित केले आहे.

**मंडळी** तू त्याला आपल्या हातच्या कृत्यांवरचे वरचे प्रभुत्व दिले आहे, तू सर्वकाही त्याच्या पायाखाली ठेविले आहे.

**वाचक:** शेरढेमेंढरे, गुरेढोरे ही सारी, तसेच वनपशू; आकाशातील पाखरे, समुद्रातील मासे व जलात संचार करणारे सर्व प्राणी.

**मंडळी**: हे परमेश्वरा, आमच्या प्रभू, सर्व पृथ्वीवर तुझे नाम किती थोर आहे!

गीत

तुई अमोरीस इगनेम

2. पूर्वेकडील आणि ओरिएंटल परंपरेतील अनेक आवृत्या परिशिष्टात सुचविलेल्या आहेत

3. (पृष्ठ 19) परिशिष्टा मध्ये अरबी आवृत्ती आढळू शकते.

**प्रथम वाचन**

यशया 9:2-7

**गीत**
प्रकाशाचं गीत (संत इफ्रेम)

**दुसरे वाचन**
इफीसकरास पत्र 5:8-14

**शुभवर्तमानाचा जयजयकार**
(गायिले)

**शुभवर्तमान वाचन**
मत्तय 2:1-12

**संदेश**
(शांततेचा क्षण किंवा गीत)

**नायसीन सिद्धांत**

**सर्वसमर्थ एकच देव, जो पिता, आकाश व पृथ्वी आणि सर्व दृश्य आणि अदृश्य वस्तूंचा निर्माणकर्ता,**
**त्यावर मी विश्वास ठेवतो, आणि एकच प्रभू येशू ख्रिस्त, जो देवाचा एकुलता एक पुत्र,**
**जो सर्व युगांपूर्वी आपल्या पित्यापासून जनीत झाला,**
**देवापासून देव, प्रकाशापासून प्रकाश, खऱ्या देवापासून खरा देव,**
**जो जनीत आहे, हे मृत नाही, जो पित्याच्या तत्त्वाचा आहे, ज्याच्याद्वारे अवघे झाले,**
**जो आम्हां मनुष्यांसाठी व आमच्या तारणासाठी स्वर्गातून उतरला,**
**आणि पवित्र आत्म्याचे योगे कुमारी मरिया हीजपासून देहधारी मनुष्य झाला.**
**आणि पंत्य पिलाताच्या अधिकाराखाली आम्हांसाठी ज्याला कृसी दिले,**
**ज्याने दुःख भोगिले व ज्याला पुरीले. जो शास्त्रलेखाप्रमाणे तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला,**
**आणि स्वर्गात चढला, आणि पित्याच्या उजवीकडे बसला आहे.**
**जो जिवंतांचा व मेलेल्यांचा न्याय करावयास गौरवाने पुन्हा येणार आहे,**
**ज्याच्या राज्याचा अंत होणार नाही, त्यावर मी विश्वास ठेवतो.**
**आणि पवित्र आत्मा प्रभु व जिवनदाता पिता व पुत्र यापासून**
**जो निघतो आणि पिता व पुत्र यासह ज्याची आराधना व गौरव होते.**
**जो भविष्यवक्ताद्वारे बोलला, त्यावर मी विश्वास ठेवतो,**
**आणि एक पवित्र कॅथोलिक आणि एक प्रेषितीय मंडळी विषयी मी विश्वास धरितो.**
**पापांच्या क्षमेसाठी एक बाप्तीस्मा आहे हे मी पत्करीतो.**
**आणि मेलेल्यांचे पुनरुत्थान व परलोकीचे जीवन, यांची मी प्रतीक्षा करतो.**

4. इंग्रजी भाषांतर आणि रेकॉर्डिंगची लिंक परिशिष्टमध्ये आढळू शकते.

## ख्रिस्ताचा प्रकाश सामायिक करणे

*रात्रीचे आकाश जागृत करण्यासाठी गडद निळ्या कापडाचा तुकडा टांगला जातो ज्यावर एक मोठा तारा ठेवला जातो कागदी तारे उपासकांसाठी उपलब्ध करून दिल्या जातात त्यांना पुढे येण्यासाठी आणि त्यांचे तारे जोडण्यासाठी आमंत्रित केले जातात.*

**पुढारी:** एका ताऱ्याने मागी लोकांना ख्रिस्ताकडे नेले. आणि आज हा तारा ख्रिस्ताच्या उपस्थितtiकडे निर्देश करतो. जो आपल्यासाठी प्रकट झाला आणि ज्याचा प्रकाश आपल्यावर प्रकाशतो. जसे मागी लोक ताऱ्याला पाहून बेथलहेमास गेले, आज आपण त्या ताऱ्याखाली एकत्रित आहोत, आकाशात आमचे स्वतःचे तारे जोडत आहोत, आणि मंडळीच्या दृश्यमान ऐक्यासाठी आमच्या स्वतःच्या भेटवस्तू आणि प्रार्थना एकत्र करीत आहो. जसे आम्ही त्या ध्येयाकडे वाटचाल करू, तसे आमचे जीवन तेजस्वी साक्ष देवो, जेणेकरून ख्रिस्ताला जाणून घेण्यासाठी इतरांना प्रवृत्त करो.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

**पुढारी:** विश्वासाने आणि आत्मविश्वासाने आपण देवासमोर प्रार्थने मध्ये येतो.

जो पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा आहे.

**वाचक:** पूर्वेकडून मागी लोक नमन करावयास आले आणि त्यांच्या देशांमधून आणि संस्कृतीमधून विशेष भेट त्यांनी अर्पण केले.

आज आम्ही जगातील सर्व ख्रिस्ती समुदायासाठी प्रार्थना करतो, त्यांच्या उपासनेमध्ये आणि परंपरेमध्ये विविधता आहे:
प्रभु या खजिन्याचे जतन कर, अशी तुला आम्ही विनंती करीतो, विशेषत: जगाच्या भागात ख्रिस्ती लोकांची उपस्थिती आणि अस्तित्व हिंसाचारामुळे धोक्यात आले आहे.

**मंडळी:** हे प्रभू, आमची प्रार्थना ऐक (बोललेली किंवा गायलेली)

**वाचक:** हुकुमशाह हेरोद राज्याच्या आदेशाने प्रभूच्या जीवनाची सुरुवातीची वर्षे हिंसाचार आणि हत्याकांड यांनी चिन्हांकित केली होती.
आम्ही जगातील अशा ठिकाणी राहणाऱ्या मुलांसाठी प्रार्थना करतो जिथे हिंसा सुरू आहे आणि त्याचे परिणाम मूर्त आहेत.
हे प्रभू, आमच्या मंडळी मधील ऐक्य आणि परस्पर प्रेमाचे बंध मजबूत कर आणि आम्हाला सहकार्य करण्यास आणि तुझ्या पवित्र नावाचे साक्षीदार होण्यास मदत कर. अत्याचारितांचे आणि उपेक्षितांचे रक्षण करण्यासाठी आम्हाला काम करण्याची प्रेरणा दे. जसे आम्ही आमच्या मध्ये तुझे राज्य बघतो तसेच जुलमी राजवट यांचा सामना करण्यासाठी आम्हास एकत्र उभे राहण्यास प्रोत्साहित कर.

**मंडळी:** हे प्रभू, आमची प्रार्थना ऐक.

**वाचक:** मागी लोकांच्या भेटीनंतर, पवित्र कुटुंबाने अरण्यामध्ये स्थलांतराचा अनुभव घेतला आणि इजिप्त देशांमध्ये निर्वासित झाले. आम्ही जगातील सर्व निर्वासित लोकांसाठी, न मुळावलेल्या लोकांसाठी प्रार्थना करतो: हे प्रभू, त्यांच्या घरातून बाहेर काढलेल्यांना लोकांना आदरातिथ्य दाखविण्यासाठी आम्हाला सुसज्ज कर आणि सुरक्षित आश्रयस्थानच्या शोधात असलेल्या लोकांचे स्वागत करण्याचा आत्मा दे.

**मंडळी:** हे प्रभू आमची प्रार्थना ऐक.

**वाचक:** येशूचा जन्म ही सर्वांसाठी चांगली बातमी होती, वेगवेगळ्या राष्ट्रातून आणि धर्मातून पवित्र बाळाची उपासना करण्यासाठी ते एकत्र आले. इतर धर्माच्या लोकांसोबत संवाद आणि एकोपा साधण्याच्या आमच्या प्रयत्नासाठी आम्ही प्रार्थना करतो, प्रभू, आदराने त्यांच्यासोबत प्रवास करण्यासाठी आम्हाला संयम आणि नम्रता दे.

**मंडळी:** हे प्रभू आमची प्रार्थना ऐक,

**वाचक:** मागी लोक वेगळ्या मार्गांनी त्यांच्या घरी परतले. या बदलत्या जगामधील आमच्या मंडळयांसाठी आम्ही प्रार्थना करतो. हे प्रभू, तुला अनुसरण्यासाठी आणि तुझी साक्ष देण्यासाठी नवीन आणि रचनात्मक मार्ग शोधण्यास मदत कर जेणेकरून जग विश्वास ठेवेल.

**मंडळी:** हे प्रभू, आमची प्रार्थना ऐक.

**वाचक:** जेव्हा मागी लोकांनी त्या पवित्र बाळाला पाहिले तेव्हा ते आनंदित झाले. स्वर्गीय पित्या, त्याच्याकडे आमची नजर ठेव म्हणजे आम्ही आमचा मार्ग गमावणार नाही, येशु ख्रिस्तामध्ये आम्हाला एकत्रित कर, जो मार्ग, सत्य आणि जीवन आहे आणि ज्याने आम्हाला प्रार्थना करावयास शिकविले.

**मंडळी:** हे आमच्या स्वर्गातील पित्या

गीत

**पाठविणे आणि आशीर्वाद देणे**

**पुढारी:** आता जा आणि प्रकाशाच्या मुलांसारखे जीवन जगा.

**मंडळी:** कारण प्रकाशाचे फळ चांगले आणि योग्य आणि सत्य आहे त्या सर्वांमध्ये आढळते.

**पुढारी:** अंधकाराच्या निष्फळ कार्यामध्ये भाग घेऊ नका.

**मंडळी:** आपण झोपेतून जागे होऊ या आणि ख्रिस्त आपल्यावर प्रकाशेल.

**पुढारी:** संपूर्ण समाजाला जो पिता आणि प्रभू येशू ख्रिस्त याजपासून शांती आणि विश्वासाने प्रेम असो. या सर्वांचे आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर अखंड प्रेम आहे त्यांच्यावर कृपा असो.

**मंडळी:** आमेन, देवाचा धन्यवाद असो

गीताचा भाग

5. इफिसकरास पत्र 5 व 6 वर आधारित

# परिशिष्ट

ही गीते मंडळयांची मध्यपूर्व परिषदेने सुचविलेले आहेत. ख्रिस्ती ऐक्यता 2022 साठी प्रार्थना सप्ताहाचा पहिला प्रकल्प तयार केलेला आहे आणि त्यांच्या जबाबदारीच्या अंतर्गत प्रकाशित झालेले आहे.

इंग्रजी भाषांतर

**प्रकाशाचे गाणे (संत इफ्रेम)**

नीतीमानाचा प्रकाश आणि सरळ लोकांचा आनंद हा आपला प्रभू येशू ख्रिस्त आहे.
पित्या पासून जन्मलेला तो आपल्यासमोर प्रकट झाला.
तो आपल्याला अंधारातून सोडवण्यासाठी आणि त्याच्या प्रकाशाच्या तेजाने भरण्यासाठी आला.
आपल्यावर दिवस उगवला आहे. अंधाराची शक्ती नाहीशी होत आहे.
खऱ्या प्रकाशातून तो आपल्यासाठी उद्भवते.
प्रकाश जो आपल्या अंधकारमय डोळ्यांना प्रकाशित करतो त्याची महिमा जगावर चमकते
आणि अथांग खोलवर प्रकाश टाकतो

मृत्यूचा नाश केलेला आहे.
रात्र नाहीशी झालेली आहे आणि शेओल चे दारे तुटलेले आहेत.
प्राचीन काळापासून अंधारात पडलेले प्राणी प्रकाशाचे वस्त्र धारण केलेले आहे.
मृत धुळीतून उठतात आणि गातात कारण त्यांच्या जवळ तारणारा आहे.
तो तारण आणतो आणि आपल्याला जीवन देतो, तो त्याच्या पित्याकडे उंचावर जातो.
तो त्याच्या गौरवशाली वैभवात परत येईल.
आणि त्याच्याकडे टक लावून पाहणार यांवर प्रकाश टाकला आहे.

बेथलेहेममध्ये ख्रिस्त जन्मलेला होता. पूर्वेकडून मागील लोक त्याला आदर देण्यासाठी आले आहे. ते विचारीत होते, "ख्रिस्त कुठे जन्मलेला आहे? आम्ही त्याला आशीर्वाद देण्यासाठी, नमन करण्यासाठी आणि त्याची उपासना करण्यासाठी आलेलो आहे.

2. प्रभू, मी तुझ्या विस्मयकारक उपस्थितीमध्ये येतो, छायेमधून तुझ्या प्रकाशात. रक्ताने मी तुझ्या प्रकाशात प्रवेश करणार, माझा शोध कर, माझा प्रयत्न कर, सर्व अंधकार नष्ट कर, माझ्यावर प्रकाश टाक, माझ्यावर प्रकाश टाक.

3. जसे आम्ही तुझ्या राजेशाही प्रकाशाकडे पाहतो तसाच आमचा चेहरा तुझी समानता दर्शवितो. गौरवातुन गौरवात बदलत असतो. आमचे जीवन तुझ्या गोष्टी सांगू दे, माझ्यावर प्रकाश टाक, माझ्यावर प्रकाश टाक

## आमचा प्रभू, आमचा प्रभू

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला, आमच्या सारखा गोठ्यात जन्मला कारण तो आमच्यावर खरोखर प्रेम करतो

**ध्रुव पद**: तो आपल्या सर्वांवर प्रेम करतो, त्याने आपल्या सर्व आत्म्यांचा उद्धार केला (2)

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला (2)
मी आनंदी आहे, मी आनंदी आहे, माझ्या प्रभू तुझ्या जन्माने, बेथलेहेम येथे तुझ्या जन्माने
माझ्या आत्म्याला खूप आनंद झाला

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला (2)
गब्रिएलच्या शब्दामुळे कुमारी आनंदित झाली
इम्मानुलच्या जन्माने आमची अंत:करणे आनंदित आहे

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला (2)
पूर्वेला ज्ञानी लोकांसाठी तारा चमकला,
आमची अंत:करणे पवित्र प्रभूला प्रज्वलीत मेणबत्त्या आहेत.

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला (2)
आकाशातील देवदूतांनी त्याच्या जन्मामुळे परमेश्वराची स्तुती केली,
ऊर्ध्वलोकी देवाला गौरव आणि पृथ्वीवर शांती असो

आमचा प्रभू, आमचा प्रभू, आमच्यासाठी आमचा प्रभु आला(2)

# आठ दिवसांसाठी पवित्र शास्त्र संबंधित मनन आणि प्रार्थना

## दिवस 1

"आम्ही पूर्वेस तारा पाहिला" (मत्तय 2:2)

आम्हाला उंच कर आणि आम्हाला तुझ्या परिपूर्ण प्रकाशाकडे ओढ

## वाचन

| | |
|---|---|
| जखऱ्या 4:1-7 | मला सोन्याचा दीपवृक्ष दिसतो |
| स्तोत्रसंहिता 139:1-10 | तुझा उजवा हात मला धरून ठेविल |
| 2 तिमथी 1:7-10 | ही कृपा युगाच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती |
| योहान 16:7-14 | तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हाला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल. |

### प्रतिबिंब

या नाजूक आणि अनिश्चित जगामध्ये, आपण दुरूनच एक प्रकाश, आशेचा किरण शोधतो. वाईटाच्या मध्ये आम्ही चांगुलपणाची इच्छा करतो. आम्ही स्वतःमध्ये चांगले ते शोधतो, अनेकदा आपण आपल्या कमकुवतपणा मुळे भारावून जातो की आशा आपल्याला अपयशी करते. ज्या देवाची आपण उपासना करतो त्याच्यावर आपला आत्मविश्वास टिकून आहे. देवाने, त्याच्या ज्ञानामध्ये, दैवी मध्यस्थीसाठी आशा करण्यास सक्षम केले, परंतु देवाची मध्यस्थी एक व्यक्ती असेल आणि प्रभू स्वतःच आपल्या मध्ये प्रकाश असेल याची आम्ही अपेक्षा केली नव्हती. ह्यामुळे आमच्या अपेक्षा जास्त झाल्या. "सामर्थ्याचा आणि प्रेमाचा आत्मा" ही देवाने आपल्याला दिलेली देणगी आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर आणि क्षमतेवर विसंबून राहून देवाच्या परिपूर्ण प्रकाशाच्या मार्गाकडे ओढल्या गेलो नाही, परंतु देवाच्या पवित्र आत्म्याने ओढले गेलो आहो.

मानवजातीच्या अंधकारामध्ये पूर्वेकडून तारा चमकला. त्यात आपण एक प्रकाश बघतो, जो अंधाराच्या खोलवर प्रवेश करतो, जो आपल्याला एकमेकांपासून वेगळं करतो. ताऱ्याचा प्रकाश हा केवळ एक विशिष्ट ऐतिहासिक क्षणाचा प्रकाश नव्हता परंतु तो इतिहासाचा चेहरा बदलवीत आहे आणि चमकवित आहे. युगानुयुगे, आणि

तेव्हापासून तारा प्रथम दिसला, ख्रिस्ताच्या अनुयायांच्या जीवनामुळे जगाला कळून चुकले आहे की आशा ही पवित्र आत्म्याने प्रेरित केलेली आहे. या गोष्टी इतिहासामध्ये देवाच्या कार्याची आणि पवित्र आत्म्याच्या उपस्थितीची साक्ष देतात. इतिहासात उलट सुलट आणि बदलती परिस्थिती असूनही, पुनःरुथीत झालेला प्रकाश देत आहे. या परिपूर्ण प्रकाशात सर्वांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रकाशाप्रमाणे इतिहासाच्या प्रवाहात वाहत आहे आणि अंधारावर मात करीत आहे, जे आपल्याला एकमेकापासून वेगळे करते.

ख्रिस्ती ऐक्यासाठी आपल्याला वेगळे करणाऱ्या अंधारावर मात करण्याची इच्छा आपल्याला प्रार्थना आणि कार्य करण्यास भाग पाडते.

### प्रार्थना

प्रभु देवा, ख्रिस्ताच्या प्रकाशाने आमचा मार्ग प्रकाशित कर जो आमच्या पुढे जातो आणि आम्हाला नेतो आम्हाला प्रकाशन दे आणि आमच्यामध्ये वास कर. आमच्या हृदयातील एका लहान गोठ्याचा शोध घेण्यासाठी आम्हाला मार्गदर्शन कर जिथे एक मोठा प्रकाश अजूनही राहील. प्रकाशाचा निर्माणकर्ता, न मिटणारा तारा, येशू ख्रिस्त, आमचा प्रभू आणि तारणारा या देणगी बद्दल आम्ही तुझे आभार मानतो. आमच्या यात्रेसाठी तो एक प्रकाश असू दे. आमचे विभाजन बरे कर आणि आम्हाला प्रकाशाच्या जवळ आण, जेणेकरून त्याच्यामधील आमची एकता आम्ही शोधू शकू, आमेन

# दिवस 2

“यहूद्यांचा राजा जन्मास आला तो कुठे आहे?” (मत्तय 2:2)

नम्र नेतृत्व भिंती पाडते आणि प्रेमाने बांधते.

### वाचन

| | |
|---|---|
| यिर्मया 23:1-6 | तो राजा होऊन राज्य करेल आणि सुज्ञतेने वागेल. |
| स्तोत्रसंहिता 46 | तो दिगंतापर्यंत लढाया बंद करितो. |
| फिलिपैकरास पत्र 2:5-11 | तो देवाच्या स्वरूपाचा असुनही देवाच्या बरोबरचे असणे हा लाभ असे त्याने मानले नाही. |
| मत्तय 20:20-28 | मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास आला आहे. |

### प्रतिबिंब

यिर्मया इस्त्रायलच्या वाईट राजांच्या नेतृत्वांचा निषेध करतो, ज्यांनी लोकांची फूट पाडली आणि लोकांना विखुरले. त्यांच्या नेतृत्वामुळे देशांचा नाश झाला आणि त्यांच्या लोकांना बंदीवानात नेण्यात आले. याउलट प्रभु एका मेंढपाळ-राजाला अभिवचन देतो की तो या देशात न्याय आणि धार्मिकता अमंलात आणील आणि त्याच्या कळपातील सदस्यांना एकत्र करील.

आपल्या जगाला चांगल्या नेतृत्वाची इच्छा असते आणि ती इच्छा पूर्ण करण्यासाठी तो अशा व्यक्तीच्या सतत शोधात असतो. अशाप्रकारचा पुढारी कुठे मिळेल? देवाच्या हृदयानंतर राजा किंवा पुढारी यांचे उदाहरण फक्त आपण ख्रिस्तामध्ये पाहिलेले आहे. जसे आपल्याला त्याचे अनुकरण करण्यासाठी बोलाविले आहेत तसेच जगात आणि

मंडळीमध्ये त्याच्या सेवक-राज्याच्या मार्गाचे अनुकरण करण्यासाठी देखील बोलाविले आहे. आपण ख्रिस्तामध्ये तोडत नाही किंवा विभाजन करीत नाही परंतु देवाच्या नावाच्या गौरवासाठी तयार करतो आणि संपूर्ण बनवतो. त्याचे नियम स्व:सेवा नाही आणि तो सक्तीही करीत नाही उलट त्याच्या मध्ये आपल्याला एक प्रेमळ नम्र, सेवक भेटतो जो देवाच्या समानतेचा असून लाभ मानीत नाही. तो सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास येतो, आणि त्याच्या अनुयायांना देखील तेच करण्यास बोलाविले आहे.

आज मध्यपूर्व आपल्या लोकांना धार्मिक आणि न्याय म्हणून निर्वासित होण्याचे नुकसान तिथेच नाही तर पूर्ण जगामध्ये अनुभवत आहे. तरी आपल्याला आशा आहे की जरी आपल्या आजूबाजूचे राज्य डगमगले आणि राष्ट्रांमध्ये कोलाहल सुरू असली तरीही आम्ही हादरणार नाही.

जगातील आणि मंडळयांतील पुढाऱ्यांना, देवाच्या लोकांना विखरण्यासाठी किंवा विभाजन करण्यासाठी नाही तर एकत्र आणण्याची जबाबदारी आहे. स्वतःच्या फायद्यासाठी, सामर्थ्यसाठी आणि पदासाठी या इच्छेमुळे जगात आणि मंडळीमध्ये इतकी विभागणी आहे. जेवढे ख्रिस्ती लोक अधिक विश्वासू पणे ख्रिस्ताचा सेवक नेतृत्वाचे अनुकरण करतील तितके जास्त जगाच्या आणि मंडळीच्या विभाजनावर मात होईल. जसे आपण धार्मिकतेसाठी, न्याय आणि सर्वांच्या कल्याणासाठी शांती साठी कार्य करतो, तेव्हा आपण मेंढपाळ-राजाला नम्र साक्ष देतो आणि इतरांना त्याच्या उपस्थितीमध्ये आकर्षित करतो.

### प्रार्थना

देवा, तु आमचा एकमेव आश्रय आणि सामर्थी, आम्ही तुझे गौरव करतो कारण तू न्याय आणि नीतिमान देव आहेस. आम्ही तुझ्यासमोर कबूल करतो की आम्ही अनेकदा जगिक नेतृत्वाची लालसा बाळगतो. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताला सामर्थ्यवानचा राजवाड्यात नाही तर त्याच्या नम्र गोठ्यात आणि त्याच्या सोम्यतेमध्ये अनुकरण करण्यास शोधण्यास मला मदत कर. तुझ्या आज्ञाधारीकते मध्ये एकमेकांची सेवा करण्यास, स्वतःला रिकामे करण्यास प्रोत्साहित कर.

आम्ही येशू ख्रिस्ताच्या नावाने प्रार्थना करतो, जो तुमच्याबरोबर आहे आणि त्याच्या गौरवामध्ये पवित्र आत्मा सदैव राज्य करतो. आमेन

## दिवस 3

“हेरोद राजाने हे ऐकले तेव्हा तो व
त्याच्याबरोबर सर्व यरुशलेम घाबरून गेले”. (मत्तय 2:3)

ख्रिस्ताची उपस्थिती जगाची उलथापालथ करते.

### वाचन

| | |
|---|---|
| नहेम्या 4:18-21 | आम्ही काम करू लागलो... त्याच्यातले अर्धे लोक पहाटेपासून तारे दिसू लागत तोपर्यंत भाले घेऊन उभे असत. |
| स्तोत्रसंहिता 2:1-10 | राष्टांनी दंगल का मांडीली आहे? |
| 2 थेस्सलनी. | 2:13-3:5 परंतु प्रभू विश्वासू आहे, तो तुम्हाला सामर्थ्य देईल |

मत्तय 2:1-5 तो आणि सर्व यरूशलेम अस्वस्थ होते.

**प्रतिबिंब**

प्रभू आपल्यामध्ये आला. ख्रिस्ताचे आगमन जगाच्या मार्गात अडथळा आणते. बऱ्याच राष्ट्रीय नेत्यांमध्ये तफावत आहे, परमेश्वर नम्रतेने वाईटाचा आणि अत्याचाराचा निषेध करतो की ज्यामध्ये सत्तेची आणि दर्जाची महत्त्वाकांक्षा सहभागी आहे. येशूचे आगमन जीवनाच्या परिवर्तनासाठी आणि हृदयाच्या बदलासाठी बोलाविते, जेणेकरून लोक अमानवीय बनवणाऱ्या आणि त्यांना त्रास देणाऱ्या सर्व गोष्टीपासून मुक्त होईल . येशु आम्हाला दाखवितो की देव दुःख सहन करणाऱ्यांच्या सोबत आहे कारण देवाच्या आवडत्या मुलासारखी प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा असते. येशुची उपस्थिती तंतोतंत अशांती निर्माण करते कारण तो श्रीमंतांची आणि शक्तिशाली लोकांची नालस्ती करतो, जे फक्त स्वतःच्या हितासाठी आणि चांगल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यासाठी कार्य करतात. परंतु जे शांतीसाठी आणि ऐक्यासाठी कार्य करतात त्यांच्यासाठी येशू ख्रिस्ताचे आगमन आशेचा प्रकाश आणतो.

आज आम्हाला न्याय मिळवून देण्याच्या रचनात्मक कृतीसाठी, स्वतःला वचनबद्ध होण्यासाठी जगातील वास्तविकतेसाठी आमंत्रित केलेले आहे. हे प्रतिबिंबित करण्याची आणि स्वीकारण्याची गरज सूचित करते. जेव्हा आपले मार्ग देवाचे न्याय आणि शांतीचे मार्ग नसतात. जेव्हा ख्रिस्ती लोक न्यायासाठी आणि शांततेसाठी एकत्रित काम करतात तेव्हा आमचे प्रयत्न अधिक शक्तिशाली होतात. जेव्हा ख्रिस्ती लोक अशाप्रकारे काम करतात, ख्रिस्ती ऐक्यासाठी आमच्या प्रार्थनेचे उत्तर दृश्यमान केले जाते. आज जगामध्ये आपल्या मध्ये असलेली ख्रिस्ताची उपस्थिती इतर लोक ओळखतात. आपल्या कृतीने आणि शब्दाने आपण अनेकांना आशेचा प्रकाश आणू शकतो, जे अजूनही राजकीय अशांततेत, सामाजिक दारिद्र्यात आणि संरचनात्मक भेदभावामध्ये राहत आहे. चांगली बातमी ही आहे की देव विश्वासू आहे आणि तो नेहमीच आपल्या हानीपासून संरक्षण करतो आणि आपल्याला बळ देतो आणि इतरांच्या भल्यासाठी काम करण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो. विशेष करून जे दुःख, द्वेष, हिंसा आणि वेदना यांच्या अंधारामध्ये आहेत.

**प्रार्थना**

हे प्रभू, तू आम्हाला अंधकारातून येशुकडे नेले आहे. तु आमच्या जीवनामध्ये आशेचा तारा प्रकाशित केलेला आहे. तुझ्या प्रेमाचे, न्यायाचे आणि शांततेचे राज्य घडवून आणण्याच्या आमच्या वचनबद्धतेमध्ये एकजूट होण्यासाठी आम्हाला मदत कर. जे भ्रमाच्या आणि निराशेच्या अंधारामध्ये राहत आहे त्यांच्यासाठी आशेचा प्रकाश होण्यासाठी मदत कर. हे प्रभु, आमचा हात घे, जेणेकरून आमच्या दैनंदिन जीवनामध्ये आम्ही तुला बघू शकू. जसे आम्ही तुझे अनुसरण करु, तसे आमची भीती आणि चिंता दुर कर. तुझा प्रकाश आमच्यावर चमकू दे आणि आमचे अंतःकरण प्रज्वलित कर, जेणेकरून तुझे प्रेम आम्हाला उबदारपणाने घेरेल. तुझ्याकडे आम्हाला उंच कर, तु, ज्याने आमच्यासाठी स्वतःला रिक्त केले, जेणेकरून आमचे जीवन तुझे, पिता, पुत्र, पवित्र आत्म्याचे गौरव करेल. आमेन

# दिवस 4

"आणि तू बेथलेहेम, कनिष्ठ आहेस असे नाही". (मत्तय 2:6)

लहान आणि दुःखी असलो, तरीही आम्हाला कशाचीही कमतरता नाही.

**वाचन**

मिखा 5:2-5a, 7-8 तुज मधून एक जण निघेल... जो इस्रायलवर राज्य करेल

स्तोत्रसंहिता 23 परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, मला काही उणे पडणार नाही

1 पेत्र 2:21-25 आता तुमच्या जीवांचा मेंढपाळ व संरक्षक ह्याच्याकडे तुम्ही परत फिरला आहा.

लूक 12:32-40 हे लहान कळपा, भिऊ नको.

## प्रतिबिंब

बेथलेहेमच्या लहान आणि नम्र शहरांमधुन, प्रभुने, देवाच्या पुत्राने, या जगात प्रवेश केला. गावातील एका नम्र मुलीच्या गर्भातून, त्याने मानव स्वरूप धारण केले, अस्पष्टतेमध्ये आणि साधेपणामध्ये मानवतेचे जीवन जगणे निवडले. तो शेतात धान्य बनला, पिठामध्ये खमीर बनला, आणि आपल्या डोळ्यांना प्रकाशाचा एक छोटासा किरण बनला आणि त्या प्रकाशाने पृथ्वी भरली. इफ्राथाच्या अस्पष्टतेतुन एक शासक, आमच्या जीवांचा मेंढपाळ व संरक्षक आला आहे. तो जरी आपला मेंढपाळ असला, तरी तो कोकरा बनला, आपण बरे व्हावे म्हणून जगाची पापे वाहीले.

यहूद्याच्या मोठ्या कुळांमध्ये फारसे महत्व नसले तरी, सर्व मेंढपाळांचा मेंढपाळ, सर्व राज्यांचा राजा याच्या जन्मामुळे बेथलेहेम महान बनले. बेथलेहेम, असे नाव ज्याचा अर्थ "भाकरीचे घर" आहे, हे मंडळीसाठी रूपक होऊ शकते की जें जगाला जीवनाची भाकर आणते. मंडळी, आजचे बेथलेहेम, अशी जागा होत आहे जिथे दुर्बल, शक्तिहीन आणि लहान यांचे स्वागत होत आहे कारण तिथे प्रत्येकाचे स्थान आहे. या धान्याच्या संग्राहामुळे कापणी तयार होत आहे. संयुक्त खामिरामुळे शक्तिशाली बनत आहे. केंद्रीत किरणे प्रकाशाचा मार्ग बनत आहे.

राजकीय गडबडीत, लोभाची वाढती संस्कृती आणि या जगात सत्तेचा दुरुपयोग, मध्यपूर्वेतील इतरांप्रमाणे, ख्रिस्ती लोक, छळ सहन करीत आहे आणि उपेक्षितांची भावना अनुभवत आहे, हिंसा आणि अन्यायाच्या भीतीने जगत आहे, तरीही ते घाबरत नाही कारण मेंढपाळ त्यांच्यासोबत चालतो, एका ठिकाणी एकत्र करतो आणि त्याच्या प्रेमळ उपस्थितीचे चिन्ह बनवते. संयुक्तपणे, ते खमीर आहे जे जमा करते. ख्रिस्तामध्ये ते नम्रतेचा नमुना पाहतात, आणि विभाजनावर मात करण्यासाठी त्याच्यापासून ते आवाज ऐकतात. आणि एका कळपामध्ये एकत्र होतात. जरी ते थोडे असले, त्यांच्या दुःखसहनामध्ये ते कोकऱ्यांच्या पावलाचे अनुसरण करतात, ज्याने जगाच्या तारणासाठी दुःख सहन केले. जरी ते कमी असले तरी ते आशेमध्ये पक्के आहेत, त्यांना कशाचीही कमी पडत नाही.

## प्रार्थना

उत्तम मेंढपाळ, लहान कळपाचे तुकडे होणे तुझ्या पवित्र आत्म्याला दुःखी करते. तुझ्या इच्छेचा पाठलाग करीत असताना, आमच्या कमकूवत प्रयत्नाला आणि मंदपणाला क्षमा कर. तुझे स्वतःचे हृदय असणारा, सुज्ञ मेंढपाळ आम्हाला दे, जे विभाजनाचे पाप ओळखतात, आणि जे धार्मिकतेमध्ये आणि पवित्रतेमध्ये,तुझ्या ऐक्यतेमध्ये मंडळीचे नेतृत्व करतील. हे प्रभू आमची प्रार्थना ऐकण्यासाठी आम्ही तुला विनंती करतो. आमेन

# दिवस 5

“तारा त्या जागेच्या वर जाऊन थांबेपर्यंत त्यांच्या पुढे चालला” (मत्तय 2:9)

एका परमेश्वराने मार्गदर्शन केलेला

## वाचन

| | |
|---|---|
| निर्गम 13:17-14:4 | मेघस्तंभ मधून परमेश्वर त्याच्या समोर चालला |
| स्तोत्रसंहिता 121 | मी आपली दृष्टी पर्वताकडे लावितो, मला साहाय्य कुठून येईल? |
| प्रकटीकरण 22:5-9 | कारण प्रभू परमेश्वर त्यांचा प्रकाश असेल |
| मत्तय 2:7-10 | तारा त्या जागेच्या वर जाऊन थांबेपर्यंत त्यांच्या पुढे चालला |

## प्रतिबिंब

पुन्हा आणि पुन्हा शास्त्रभाग आपल्याला सांगतात कि देव त्याच्या लोकांसोबत कसा चालतो, त्यांचे संरक्षण करतो आणि रात्रंदिवस त्यांच्यावर लक्ष ठेवतो. मार्ग नेहमी सरळ असू शकत नाही, काही वेळा आम्हाला आमची पावले मागे घेण्यास नेले जाते आणि इतर वेळा दुसऱ्या मार्गाने परत येण्यास नेले जाते. परंतु जीवनाच्या आपल्या सर्व प्रवासात, आपण खात्री बाळगू शकतो की देव डुलकी घेत नाही व झोपतही नाही, आपले पाय घसरुन आपण पडू नये म्हणून आपले संरक्षण करतो.

सर्वात मोठ्या अंधकारात हा देवाचा प्रकाश आपल्या सोबत आहे. त्याचा प्रकाश संदेष्टाच्या द्वारे प्रकाशतो ज्याने कराराची आठवण करून देण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी संदेष्टाना देवाच्या लोकांकडे पाठविले. सर्वात परिपुर्णपणे, वेळेच्या पूर्णतेत, देव त्याच्या एकुलत्या एक पुत्राला, येशू ख्रिस्ताला पाठवितो. तो सर्व राष्ट्रांसाठी मार्गदर्शक प्रकाश, जगामध्ये देवाचे गौरव, दैवी जीवनाचा स्त्रोत, त्याच्या रक्तामध्ये नवीन करारावर शिक्का मारलेला आहे.

ऐकमेकांशी ऐक्य साधण्याचा मार्ग आणि ख्रिस्ताबरोबर जवळीकतेचा मार्ग आहे, जो नेहमी स्पष्ट नाही. एकता निर्माण करण्याच्या आपल्या मनापासून प्रयत्नांमध्ये शास्त्रभागाच्या संदेशाकडे दुर्लक्ष करणे सोपे आहे. देव त्याच्या लोकांना त्यांच्या अपयशात आणि विभाजनात देखील सोडत नाही. हा आशेचा संदेश फक्त ख्रिस्ती लोकांसाठीच नाही परंतु पूर्ण जगासाठी आहे. जशी मागी लोकांची गोष्ट आपल्याला आठवण करून देते, सर्व प्रकारच्या लोकांना देव ताऱ्याच्या प्रकाशाने मार्गदर्शन करतो, जिथे ख्रिस्त, देवाचा प्रकाश, शोधायचा आहे.

देव पवित्र आत्म्याला पाठवितो, ज्याचा प्रकाश आपल्याला विश्वासाच्या डोळ्यांनी दैवी मुलाचे सत्य पाहण्यास, ऐकतेचे आव्हान, आणि त्याच्यामध्ये सर्व गोष्टीचा समेट सक्षम करतो. हा आत्माच आहे, जो आपल्याला अंधारातुन आणि शोकांतिकेतून ख्रिस्ताच्या प्रकाशाकडे आणि जीवनाकडे नेतो.

## प्रार्थना

हे प्रभू आमच्या पित्या, तु तुझ्या एकुलत्या एक पुत्राकडे मागी लोकांचे नेतृत्व करण्यासाठी तारा पाठविलास. तुझ्या मध्ये आमची आशा वाढीव आणि आम्हाला कळू दे की तू नेहमी आमच्या सोबत चालत आहे, तुझ्या लोकांवर लक्ष ठेवीत आहे. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाचे अनुसरण करण्यास आम्हाला शिकव, मार्ग कितीही वेगळा असला तरीही, जेणेकरून आम्ही येशू ख्रिस्तामध्ये, जगाचा प्रकाश, मध्ये आपल्या ऐक्याकडे जाऊ. तुझ्या आत्म्याकडे आमचे डोळे उघड, आणि आमच्या विश्वासामध्ये आम्हाला प्रोत्साहन दे जेणेकरून येशू हा प्रभु आहे असे आम्ही कबूल करू,जसे बेथलेहेममध्ये मागी लोकांनी त्याच्यामध्ये उपासना आणि आनंद केला तसे आम्ही करू.

हे सर्व आशीर्वाद, आम्ही तुझा पुत्र येशू ख्रिस्त याच्या नावांमध्ये मागतो, आमेन.

# दिवस 6

"तो बाळक आपली आई मरीया हिच्याजवळ असलेला त्यांनी पाहिला
व पाया पडून त्यांनी त्याला नमन केले" (मत्तय 2:11)

प्रभुभोवती उपासना करण्यासाठी एकत्रित आले.

## वाचन

| | |
|---|---|
| निर्गम 3:1-6 | मोशेने आपले मुख झाकिले कारण देवाकडे पाहण्यास तो भ्याला. |
| स्तोत्रसंहिता 84 | हे सेनाधीश परमेश्वरा, तुझी निवासस्थाने किती रम्य आहेत! |
| प्रकटीकरण 4:8-11 | जो युगानुयुग जिवंत आहे त्याला नमन करा |
| मत्तय 28:16-20 | जेव्हा त्यांनी त्याला पाहिले, तेव्हा त्यांनी त्याला नमन केले. |

## प्रतिबिंब

जेव्हा मागी लोक त्यांच्या दूर देशातून बेथलेहेम मध्ये आले आणि बाळाला आपली आई मरीया जवळ बघितले, त्यांनी त्याला नमन केले. आमच्यामध्ये असलेल्या देवाच्या प्रकटीकरण्याच्या उपस्थितीमध्ये डोळे झाकलेले आहे आणि गुडघे टेकलेले आहे. त्याचप्रमाणे जेव्हा झुडूप जळत होते, मोशेने आपले मुख झाकीले आणि देवाकडे पाहण्यास तो भ्याला. जेव्हा शिष्यांनी गालीलातील डोंगरावर येशू ख्रिस्ताला मरणातून उठलेले पाहिले, ते आश्चर्यचकित आणि अस्वस्थ झाले. तरीही त्यांनी त्याला नमन केले. स्वर्गीय प्रार्थनेमध्ये, जो सिंहासनावर बसलेला आहे, त्याच्यापुढे चोवीस वडील जण त्याला नमन करीत आहे.  देवाच्या उपस्थितीचा सामना करताना, टक लावून पाहणे, आश्चर्याने अनुसरण करणे, उपासनेकडे जाणे अशा रीतीने आपण प्रतिसाद देतो.

आम्ही पाहतो का? आम्ही आश्चर्यचकित आहोत का? आपण खरोखर उपासना करतो का? आपण न समजता किती वेळा पाहतो? आपले डोळे देवाच्या उपस्थितीत आंधळे राहतात का? जर आपण प्रथम पाहीले नाही तर सत्यामध्ये आपण कशी उपासना करू शकतो? आपल्या संकुचित दृष्टीमध्ये, बरेचदा आपल्याला आपले फक्त गोंधळलेले असहमती दिसतात, विसरतो कि देवाने आपल्या सर्वांना त्याची वाचविणारी कृपा दिलेली आहे आणि आपण एका आत्म्यामध्ये सामायिक आहोत जो आपल्याला ऐक्यामध्ये आणतो. अनेकदा आपण आपल्या अभिमानाने स्वतःच्या कायद्याचे आणि मानवी परंपरेचे अनुसरून करतो, अनेकदा ख्रिस्ताच्या रक्ताने नीतिमान ठरविले लोक, तारण्यारा येशुवर समान विश्वास ठेवून ज्या प्रेमासाठी बोलावले जाते त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

पवित्र आत्म्याने जिवंत केलेले समुदाय म्हणून, आमच्या मंडळया आम्हाला ख्रिस्त-बाळाकडे त्याला एक लोक म्हणून त्याला नमन करण्यासाठी एकत्र चालण्यास बोलावतात. दयेचा आत्मा आपल्याला एकमेकांना मार्गदर्शन करतो, आणि आपल्या सर्वांना एकत्रितपणे आपल्या एका प्रभूकडे मार्गदर्शन करतो. देवामध्ये आपले भविष्य हे ऐक्याचे आणि प्रेमाचे भविष्य आहे; या गंतव्यस्थानाकडे जाण्याच्या आपल्या मार्गाने ख्रिस्तामधील ऐक्यतेचे सत्य प्रतिबिंबित झाले पाहिजे.

## प्रार्थना

दयाळू देवा, तू आंधळ्यांना त्यांचा तारणहार म्हणून ओळखण्याची आणि आम्हाला पश्चाताप करण्याची बुद्धी दिलीस. तुझ्या दयेने आमच्या डोळ्यातील मापण्याची पद्धत काढून टाक आणि आमचा देव आणि सुटका करणारा म्हणून तुझी उपासना करण्यास आम्हाला घेऊन चल. आमच्या दुःखामध्ये आणि आमच्या पापाच्या सखोलते मध्येही,

आम्हाला आमच्या सर्व अंत:करणाने तुझ्यावर प्रेम करण्याची क्षमता दे. तुझ्या प्रकाशाच्या मार्गदर्शनाने, एका हृदयाने आणि एका मनाने, जसे पहिले शिष्य होते त्याप्रमाणे आपण एकत्र प्रवास करू. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची कृपा आपल्यावर असो, जेणेकरून आत्म्याच्या सहवासात आपण एकत्रपने तुझे गौरव करू, आणि आपल्या सभोवतालच्या लोकांना साक्षी होऊ. आमेन

## दिवस 7

"आपल्या द्रव्यांच्या थैल्या सोडून 'सोने,ऊद व गंधरस'
हि दाने त्याला अर्पिली". (मत्तय 2:11)

सहभागीतेचे दानें

### वाचन

| | |
|---|---|
| होशेय 6:1-6 | कारण मला अर्पणाची नव्हे तर अखंड प्रेमाची इच्छा आहे. |
| स्तोत्रसंहिता 100 | त्याचे उपकारस्मरण करीत, त्याच्या द्वारात स्तवन करीत, त्याच्या अंगणात प्रवेश करा. |
| प्रेषितांची कृत्ये 3:1-10 | माझ्याजवळ सोनेरुपे काही नाही, पण जे आहे ते तुला देतो |
| मत्तय 6:19-21 | कारण जेथे तुझे धन आहे, तेथे तुझे मनहि लागेल. |

### प्रतिबिंब

भाकरीचे शहर असलेल्या बेथलेहेमच्या आपल्या प्रवासात, आम्ही सुज्ञ मनुष्यांचे चिंतन करतो, जे ख्रिस्त-बाळाला अर्पण करण्यासाठी आले होते. त्यांनी त्यांच्या द्रव्याच्या थैल्या सोडल्या, आणि सोने, ऊद व गंधरस ही दाने नवजात राज्याला अर्पिली.

आपले ऐतिहासिक विभाजने, कायदे आणि विधी सह आमचे चुकीचे निर्धार, आणि आपल्या सांसारिक बाबीच्या व्यस्ततेने, आम्हाला वेगळे केलेले आहे. म्हणून आम्ही कोणते दानें त्या राजाला जो आपले जीवन प्रकाशित करण्यासाठी आणि ऐक्यतेच्या कृपेसाठी येतो त्याला अर्पण करण्यासाठी तयार केलेले आहे? आपल्याला माहित आहे की देवाला आपली संपत्ती आणि होमार्पण नको आहे परंतु त्याऐवजी त्याचे सामर्थ आपल्या गरीबीद्वारे कार्य करते: "माझ्याकडे सोने किंवा रूपे नाही". परंतु प्रभूला आपली धडधडणारी आणि प्रेमळ हृदयाची इच्छा आहे. त्याच्यासाठी आणि ख्रिस्तामध्ये असलेले आपले भाऊ-बहिणींसाठी ज्यांच्या पासून आपण वेगळे झालेले आहोत त्यांच्यासाठी प्रेमाने भरलेल्या हृदयांची इच्छा आहे. दयेच्या कृत्येसह वाहणाऱ्या हृदयांची आणि खरोखर पच्छताप करणाऱ्या हृदयांची आणि बदलाची इच्छा आहे.

प्रेमाने भरलेल्या हृदयाची भेट त्याच्यासाठी तयार करूया. आपल्याला विभाजित करणाऱ्या पापांसाठी आणि ज्याची आपण सेवा करतो त्याच्या आज्ञेपालनासाठी उपासनेमध्ये गुडघे टेकणाऱ्या हृदयांची आवश्यकता आहे. आज्ञापालन पुनरुज्जीवित करते, बरे करते आणि जे सर्व तुटलेले आहे किंवा आपल्या मध्ये जखमी झालेले आहे, आपल्या आजूबाजूला आणि आपल्या मध्ये ख्रिस्ती म्हणून समेट करते. ख्रिस्ताने आधीच त्याच्या मंडळीला ऐक्यतेची भेट दिलेली आहे. आपल्या विविध परंपरेने प्राप्त केलेली कृपा जशी आपण सामायिक करतो, सर्व दानांचा स्त्रोत प्रभू आहे असे जेव्हा आपण मान्य करतो तेव्हा आपण सहभागीते मध्ये वाढतो.

## प्रार्थना

हे देवा, सर्व स्तुती,गौरव आणि धन्यवाद तुला हो. तू तुझ्या पुत्रामध्ये, त्यांच्यासाठी प्रकट झालेला आहे, जे तुझ्या दीर्घप्रतीक्षेत होते आणि जे तुझी प्रतीक्षा करीत नव्हते. आमच्या आजूबाजूला असणारे दुःख, आमच्या विभाजनामुळे झालेले वेदना तुला ठाऊक आहेत. आज मध्य पूर्व मध्ये - असे ठिकाण ज्या ठिकाणी तू जन्म घ्यायचे निवडले, जे तुझ्या उपस्थितीने पवित्र झाले, त्या ठिकाणी स्थिती खराब होत आहे आणि जगाचे संघर्ष तुला ठाऊक आहे. तुला जाणण्यासाठी आमचे हृदये आणि आमचे मन सक्षम कर अशी आम्ही तुला विनंती करतो. जसे दुरून येणाऱ्या सुज्ञ पुरुषांमध्ये आम्ही सामील होतो, तुझ्या प्रेमासाठी आणि जे भाऊ-बहिणी आमच्या आजूबाजूला राहतात त्यांच्या प्रेमासाठी आमचे हृदय उघड, अशी आम्ही तुला प्रार्थना करतो. या जगाच्या परिवर्तनासाठी आणि एकमेकांना भेट देण्यासाठी ज्यामुळे आमच्या सहभागीतेचे पालन-पोषण होऊ शकेल असे कार्य करण्याची इच्छा आणि कारण दे. तुझी न संपणारी भेट आणि आशीर्वाद आम्हाला दे. तुझा पुत्र येशू ख्रिस्त जो तुझ्या सोबत जगतो आणि तुझ्या आणि पवित्र आत्म्याने राज्य करतो त्याच्या नावांमध्ये ही प्रार्थना करतो म्हणून तू ऐक. आमेन

# दिवस 8

"ते दुसऱ्या मार्गाने आपल्या देशास निघून गेले" (मत्तय 2:12)

वेगळे करणाऱ्या परिचित मार्गाकडून देवाच्या नवीन मार्गाच्या पलीकडे

### वाचन

| | |
|---|---|
| यिर्मया 31: 31-34 | इस्रायलच्या घराण्याबरोबर मी नवा करार करीन |
| स्तोत्रसंहिता 16 | जीवनाचा मार्ग तू मला दाखव |
| इफिसकरास पत्र 4:20-23 | तुम्ही आपल्या मनोवृत्तीत नवे केले जावे |
| मत्तय 11:25-30 | कारण ज्ञानी व विचारवंत ह्यांच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकास प्रगट केल्या. |

## प्रतिबिंब

ज्ञानी लोकांनी काय विचार केला हे आम्हाला माहीत नाही - मार्गक्रमण शास्त्रात आणि खगोलशास्त्रात ते तज्ञ होते. जेव्हा त्यांना दुसऱ्या रस्त्याने परत येण्याचा इशारा दिला होता. ते गोंधळून गेले असतील, त्यांच्या प्रवासाला प्रकाश देणारा त्याच प्रकाशाने त्यांना दुसरा मार्ग दाखविला, दुसरी शक्यता दाखविली. त्यांना दिशा बदलण्यासाठी सांगण्यात आले होते.

आपण बऱ्याचदा आपल्या गोष्टी करण्याच्या आणि जगाला पाहण्याच्या परिचित पद्धतीने स्वतःला बांधलेले असतो. जेव्हा हे मार्ग किंवा "रस्ते" बंद असतात, तेव्हा आपण पुढे कसे जायचे आणि प्रवास कसा सुरू ठेवावा याविषयी आम्ही आश्चर्य करतो. देवाची दैवी तरतूद नेहमीच आपल्याला दाखविते की आपल्यासाठी दुसरा मार्ग तयार केलेला आहे. देव त्याच्या कराराचे नूतनीकरण करण्यासाठी आहे आणि जेव्हा आपण एखाद्या अडथळ्याला सामोरे जातो तेव्हा जी निराशा आम्ही अनुभवतो त्यामधून वर उचलण्यासाठी तो तेथे आहे. आपण फक्त त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे की तो सार्वकालिक आहे, ज्याने आपल्याला प्रकाश दिला आहे, जेव्हा आमचे मार्ग आणि रस्ते बंद असतात तेव्हा नेहमीच पुढे जाण्याचा मार्ग शोधू शकतो. एक नवीन सुरुवात नेहमी शक्य असते जेव्हा आपण इच्छुक असतो

आणि आत्म्याचे कार्य करण्यासाठी तयार असतो. मंडळी म्हणून आपण भूतकाळाकडे पाहतो आणि प्रकाश शोधतो आणि नवीन मार्गाच्या शोधामध्ये आपण भविष्याकडे बघतो आणि नवीनीकरण्याच्या उत्साहासह शुभवर्तमानाच्या प्रकाशाने चमकत राहू शकू आणि एकमेकांचे स्वागत करु जसे ख्रिस्ताने देवाच्या गौरवासाठी आमचे स्वागत केले.

जुन्या परिचित मार्गावर ख्रिस्ती लोक एकमेकांपासून दूर गेले आहेत. ज्या नवीन मार्गावर देव बोलावतो, त्या मार्गावर ख्रिस्ती लोक एकत्र चालतात आणि साथीदार यात्रेकरु बनतात. नवीन रस्ते शोधण्यासाठी विवेक, नम्रता आणि धैर्य आवश्यक आहे. आता ही वेळ रूपांतराची आणि समेटाची आहे.

## प्रार्थना

हे कृपाळू देवा, जेव्हा आम्हाला एकच मार्ग माहीत असतो आणि आम्हाला वाटते की आम्ही त्यानेच परत यावे, आणि जेव्हा आम्हाला वाटते की सर्व रस्ते बंद आहेत, आणि आम्ही निराश होतो, आणि तिथे तुला आम्ही नेहमीच पाहतो. तू नूतनीकरण केलेल्या वचनांचा देव आहेस. तू आमच्या आधी एक नवीन मार्ग तयार करतो असे आम्ही पाहतो, ज्याची आम्ही कधी अपेक्षा केली नाही. तू आमच्या अपेक्षापेक्षा जास्त आहेस म्हणून आम्ही तुझे आभारी आहोत. आम्ही तुझ्या ज्ञानासाठी आभार मानतो जे आमच्या समजुती पेक्षा जास्त आहे. आम्ही तुझे आभार मानतो कारण तुझे रचनात्मक मार्ग अनपेक्षित शक्यता उघडतात. जर आम्ही आमचे नकाशे शोधले तरी आम्हाला कोणताही मार्ग सापडत नाही, तरी आम्ही नेहमीच तुलाच शोधतो, जो आम्हाला आणखी उत्कृष्ट मार्गाने घेऊन जातो. पवित्र आत्म्याच्या सहभागीते मध्ये आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे आम्ही प्रार्थना करतो की तू आम्हाला तुझ्याकडे परत घेऊन जाशील. आमेन

# मंडळयांची मध्यपूर्व परिषद

मंडळयांची मध्यपूर्व परिषद ही मंडळयांची सहभागिता आहे. जी देव आणि उद्धारकर्ता म्हणून ख्रिस्ती परंपरा आणि पवित्र शास्त्रभाग नुसार येशू ख्रिस्तामध्ये विश्वास सामायिक करतात. याची स्थापना 1974 मध्ये झाली, मंडळयांची पूर्व परिषद जवळ ही परिषद यशस्वी झाली (1962 मध्ये स्थापना झाली). ही परिषद वैश्विक प्रादेशिक अंग आहे, जी मंडळयांना सामान्य ख्रिस्ती साक्षीसाठी या प्रदेशात एकत्र आणते जिथे ख्रिस्त जन्मला, जगला, मरण पावला, पुरला गेला आणि मेलेल्यातून उठला. भौगोलिकदृष्टया मंडळयांची मध्यपूर्व परिषदेचे कार्य ईरान पासून ते पूर्वेकडील आखातापर्यंत, भूमध्य समुद्रापर्यंत, आणि पश्चिमे मधील इजिप्त पर्यंत पसरलेले आहे. याची स्थापना मुळात मंडळीच्या तीन कुटुंबाने झाली: इव्हेंज्लिकल, ओरिएन्टल ऑर्थोडॉक्स आणि ईस्टर्न ऑर्थोडॉक्स. 1990 मध्ये, या परिषदेमध्ये कॅथोलिक कुटुंब सामिल झाले आणि चौथे कुटुंब जोडले. ह्या सर्व मंडळया मिळून ते त्यांचे सामान्य ध्येय पूर्ण करण्याचा आणि एका देवाच्या गौरवाच्या ऐक्यतेची जाणीव करण्याचा प्रयत्न करतात.

## मिशन

या प्रदेशात ख्रिस्ती लोकांच्या उपस्थितीचे स्पष्ट व निश्चित अभिव्यक्ती म्हणून, परिषदेचे कार्य हे आहे की दृष्टान्तांच्या एककेंद्रभीमुखता द्वारे, मध्य पूर्वेतील मंडळयामधील वृत्ती आणि दृष्टिकोण द्वारे ख्रिस्ती लोकांच्या ऐक्यासाठी कार्य करते, विशेषत: ख्रिस्ती लोकांच्या उपस्थिती आणि साक्षी संबंधित आणि ख्रिस्ती - मुस्लिम संबंधित समस्यांवर कार्य करते. विशेषत: परिषदेचे कार्य आज असे दिसते:

- मंडळयांच्या दरम्यान पूल, अडथळे आणि पूर्वग्रह दूर करणे आणि पुनरूत्थान झालेल्या प्रभूसाठी एक सामान्य साक्षीदार तयार करणे. एक वैश्विक अंग म्हणून, MECC मध्यपूर्वेतील बहुसंख्य मंडळया एकत्र आणते, त्यांना एकत्र करण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी, प्रतिबिंबित करण्यासाठी, विश्लेषण करण्यासाठी, बोलण्यासाठी आणि कृती करण्यासाठी आणि एकत्र साक्ष देण्यासाठी जागा प्रदान करतात.

- प्रदेशातील ख्रिस्ती आणि इतर धर्मांच्या लोकांमधील पूल विशेषत: मुस्लिम: MECC संवाद मजबूत आणि विकसित करते आणि मैत्री मजबूत आणि घट्ट करण्याच्या उद्देशाने मुस्लिम लोकांसोबत भागीदारी करते आणि मानवांच्या भल्यासाठी शांतता निर्माण करते.

- मध्यपूर्व आणि उर्वरित ख्रिस्ती जगामधील पूल. MECC प्रदेशातील मंडळया आणि ख्रिस्ता मधील इतरत्र भाऊ-बहिणी यांच्यात मध्यस्थ बनण्याचा प्रयत्न करते.

हा मजकूर मध्य-पूर्व मंडळाच्या परिषदेच्या एकमेव अधिकार आणि जबाबदारी अंतर्गत पुनरुत्पादित केलेला आहे ज्यांनी ख्रिस्ती ऐक्याच्या प्रार्थना सप्ताहासाठी 2022 हा स्त्रोत मजकूर लिहिलेला आहे.

## मध्यपूर्वेतील वैश्विक वास्तविकता आणि आव्हाने

जटिल भौगोलिक राजकीय परिस्थिती आणि जागतिक, प्रादेशिक आणि स्थानीय आव्हाने असूनही मंडळयांचा मध्यपूर्व परिषदेचा, मध्यपूर्व भागांमध्ये ईश्वरज्ञान आणि वैश्विक प्रतिबिंबाचा प्रचार सुरू ठेवण्याचा निर्धार आहे. हे कार्य मुख्यत: जागतिक शिक्षण, संपर्क आणि नेटवर्किंग मजबूत करण्याद्वारे पूर्ण करते. ही परिषद संवाद आणि शांतता उपक्रम देखील विकसित करते. याशिवाय, MECC जास्तीत जास्त मदत करून त्यांच्या वैश्विक मानवतावादी आणि विकासात्मक प्रयत्नांने लोकांच्या मूलभूत गरजा आणि अधिकारापर्यंत पोहचण्याचा पाठपुरावा करते. विश्वासाबद्दल धन्यवाद असो, MECC आनंद करीत आहे जे त्यांनी वर्षानुवर्ष तयार केलेले आहे. मंडळीच्या सदस्यांच्या उदार योगदानामुळे आणि त्याचबरोबर विश्वव्यापी आणि जागतिक भागीदारांच्या योगदानामुळे ह्या कार्यला मदत होते. मानवी प्रतिष्ठा राखणे आणि देवाच्या निर्मितीची काळजी घेणे हे उद्दिष्ट आहे, हे कार्य पूर्ण करण्यासाठी भागीदाराची मुख्य भूमिका आहे हे MECC ओळखते.

मंडळयांची मध्यपूर्व परिषदेचा विश्वव्यापी एकत्रित करण्याचा सर्वोतोपरी निर्णय आहे आणि सर्व प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मंडळींचा आवाज ऐकण्यासाठी वचनबद्ध आहे. "नागरिकत्वातील भागीदारी" वर आधारित नवीन उपक्रमामध्ये संवाद भागीदारांसह सहभागी होत आहे. ते विविधतेला सामावून घेते आणि प्रेषितीय कार्य मजबूत करण्यासाठी सेवा देते, साक्ष देण्यासाठी आणि प्रदेशातील ख्रिस्ती लोकांची रचनात्मक भूमिका बजावण्यासाठी मदत करते. अशा उपक्रमामुळे दृष्टिकोनांचा परस्पर सांस्कृतिक देवाण-घेवाण चा मार्ग मोकळा होतो आणि वैचारिक आणि कट्टर भेदांच्या पलीकडे असलेली मूल्य समजतात.

याशिवाय मध्यपूर्वेतील मंडळयांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्यांचे वैश्विक जीवन आणि साक्षीदार ज्या पैकी अनेकांची मुळे त्या प्रदेशात खोलवर आहेत. इतिहास, त्यांची धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा, सलग आर्थिक संकटे, आणि भौगोलिक राजकीय शक्ती आणि संघर्ष जी या प्रदेशावर परिणाम करत आहे. प्रथम आणि सर्वात लक्षणीय वर्तमान आव्हान या प्रदेशातील ख्रिस्ती लोकांच्या उपस्थितीशी संबंधित आहे 1948 मध्ये पलेस्तीनी नकबा पासून अनेक दशके चाललेली संघर्ष आणि या प्रदेशातील विविध देशांमध्ये असलेली अशांतता जसे लेबानोन, इराक, इराण, सीरिया आणि इजिप्त, यामुळे ख्रिस्ती लोकांची स्थलांतराची प्रवृत्ती वाढली आहे. ज्यामुळे विश्वासू लोकांची संख्या कमी होत आहे आणि ख्रिस्ती लोकांच्या उपस्थितीला धोका निर्माण होत आहे.

असे असले तरी, तसेच स्थिरता आणि घटक यांचे टप्पे, मध्य-पूर्व प्रदेशातील ख्रिस्ती लोकांचा दीर्घ इतिहास यांनी पुनर्जीवन आणि संजीवनाचे टप्पे पाहिलेले आहे. काहीजण मध्यपूर्व मध्ये कमी होत चाललेल्या ख्रिस्ती उपस्थितीवर लक्ष केंद्रित करतात, इतर साक्षीदाराच्या गुणवत्तेवर आणि आध्यात्मिक जीवनावर अधिक भर देतात, जे या समुदायाला सजीव करतात. हे दोन दृष्टिकोण परस्पर अनन्य असण्यापासून दूर आहेत. जर ख्रिस्ती उपस्थिती सेवा

कार्य करीत आहे तर त्याला अर्थ प्राप्त होतो हे याच्याशी घनिष्ठपने संबंधित आहे. आज या प्रदेशातील ख्रिस्ती लोकांचे मुख्य ध्येय त्यांच्या भागीदारांसह एकत्रितपणे साक्ष देण्याच्या क्षमतेवर आहे. विविधतेच्या रक्षणासाठी, मानवी, वैश्विक किंवा आंतरधार्मिक, आणि जी विविध सामाइक आव्हाने त्यांच्या समोर आहेत त्याच्या मध्यभागी लवचिकता निर्माण करण्यासाठी आहे.

21व्या शतकात मध्यपूर्वच्या नाट्यमय इतिहासात आणखी एक निर्णायक टप्पा पाहिला आहे. गेल्या दोन दशकांमध्ये जोडलेल्या समाजांमध्ये सर्व स्तरावर गहन बदल झाले आहेत आणि अनेक देशांमध्ये सरकारची यंत्रणा कोसळली आहे. या प्रदेशाला सतत लष्करी संघर्षाचा सामना करावा लागला आहे, आर्थिक आणि सामाजिक संरचना कमकुवत झालेली आहे, सक्तीचे लोकसंख्याशास्त्रीय बदल झाले आणि मूल्य प्रणाली कडे दुर्लक्ष झाले आहे.

मध्यपूर्वेतील ख्रिस्ती साक्षीचा आणि उपस्थितीचा, प्रदीर्घ संकटामुळे आणि संघर्षामुळे खोलवर परिणाम झाला आहे, आणि म्हणूनच हे महत्वाचे होत आहे की सर्व वैश्विक भागीदार आणि इतर मानवतावादी आणि विकास संस्था ख्रिस्ती लोकांच्या संख्यामध्ये घट आणि वर्तमान संदर्भ योग्यरीत्या समजून घेण्यास सक्षम आहेत. मध्यपूर्वेतील अनेक पाश्चात्त्य हस्तक्षेप "पश्चिमात्य धारणा" वर आधारित आहे, ज्याची पूर्वेला गरज आहे. मंडळयांचे आणि मध्यपूर्व लोकांचे दृष्टीकोण हे हस्तक्षेप आतापर्यंत विचारात घेतलेले नाहीत. मंडळी, व्यक्ती आणि सरकार ख्रिस्ती लोकांच्या साक्षी वर आणि मध्यपूर्व मधील ख्रिस्ती लोकांच्या भविष्यांवर प्रश्न करीत आहे. परिणामी, ख्रिस्ती समाज मंडळयांच्या आणि त्यांच्या संस्थेच्या भूमिकेचा पुनर्विचार करत आहे. "नागरिकत्वातील भागीदारी" चा विविधतेचा नमुना आणि मुस्लिम आणि यहुदी लोकांसोबतचे सहअस्तित्व, ख्रिस्ती लोक जगाला आणि प्रदेशाला हे अर्पण करू शकतात का? मंडळयांची मध्यपूर्व परिषदेची भविष्यसूचक भूमिका नूतनीकरणासाठी, न्यायासाठी शांतीसाठी आणि शाश्वत मध्य-पूर्वसाठी काय आहे?

## आव्हानांना सामोरे जाणे

या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, MECC त्या कामासाठी खालीलप्रमाणे वेगवेगळे नमुने तयार करत आहे:

1. मंडळी संबंधित आणि ईश्वरविज्ञान संबंधित परिवर्तन घडवून आणण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करीत आहे. सामाजिक अन्यायामुळे वंचित तसेच व्यापक हिंसाचारामुळे वंचित तरुणांच्या महत्त्वाच्या भूमिकेवर जोर देऊन त्यांच्या सामान्य सेवेत मंडळी संबंधित आणि ईश्वरविज्ञान संबंधित परिवर्तन घडवून आणण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करीत आहे. इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे तरुणांना भेडसावणाऱ्या अडचणी वाढल्या आहेत. ज्यामुळे त्यांना या प्रदेशातील त्यांच्या जीवनाच्या भविष्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.
2. सहअस्तित्वाचे आधीच अस्तित्वात असलेल्या नमुन्यांचा विस्तार करणे, आदरातिथ्य, आणि एकनिष्ठतेच्या व्यापक ध्रुवीकरण्याच्या पार्श्वभूमीवरील धार्मिक विविधतेचा विस्तार करणे. MECC या प्रदेशातील निर्वासितांच्या हताश दुर्दशेला प्रतिसाद देण्यासाठी आणि अनेक घरगुती कामगारांसारख्या स्थलांतरितांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. MECC सर्वांसाठी न्याय आणि व्यवहार्य शांतता पुनर्संचयित करण्यासाठी देखील कार्य करते. पलिस्तींनी निर्वासितांसाठी टिकाऊ आणि न्याय उपाय नसणे हे लक्षात घेतले पाहिजे, यरूशलेममधून आणि वेस्ट बँक मधून पलिस्तींनी लोकांची हकालपट्टी संत आणि स्थिररीतीने सुरू राहिली, प्रदेशाच्या आसपासच्या इतर प्रदेशांमध्ये पलीस्तिनी लोकांचे सतत दुर्लक्ष आणि भेदभाव याबद्दल विशेषत: ते चिंतीत आहे. तुमच्या अन्यायकारक वागणुकीमुळे अनेक वर्षाच्या व्यवस्थापनासाठी आघात झालेल्या लोकसंख्येसाठी प्रतिष्ठा, हक्क आणि संधी याचा अपमान होतो. MECC चा पलिस्तींनी निर्वासितांचा सेवा विभाग (DSPR) नेहमीप्रमाणे समर्पक आहे.

जतन करण्याच्या बहुतेक मंडळयांच्या प्रमुखांच्या दृढनिश्चयाने प्रोत्साहित केले की MECC एक अंग म्हणून अस्तित्वात असलेल्या सर्व आव्हानांना तोंड देत असूनही आणि ख्रिस्ती धर्मशास्त्रज्ञ, मंडळी आणि समाजाची भावना याद्वारे समर्थन व्यक्त केले आहे. ख्रिस्ती लोकांमधील समन्वय आणि एकसंधता वाढवण्यामध्ये प्रयत्नशील आहे, MECC सतत कार्य करीत आहे आणि पुर्वेमध्ये अधिक तेजस्वी ख्रिस्ताचा प्रकाश चमकावा अशी प्रार्थना करत आहे.

# ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह:
## ध्येय 1968-2022

WCC विश्वास आणि आदेश आयोगाने हे साहित्य संयुक्तपणे तयार केलेले आहे. ख्रिस्ती ऐक्याचा प्रचार करण्यासाठी पॉन्टीफिकल परिषदेमध्ये 1968 मध्ये प्रथम वापरले गेले.

1968 देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी (इफिसकरास पत्र 1:14)

1969 तुम्हाला स्वतंत्रतेकरिता पाचारण झाले (गलतीकरास पत्र 5:13)
(रोम, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1970 आम्ही देवाचे सहकारी आहो (1 करिंथकरास पत्र 3:9)
(निदेराल्टाइचच्या मठात, फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1971 ... आणि पवित्र आत्म्याची सहभागिता (2 करिंथकरास पत्र 13:14)
(बारी, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1972 मी तुम्हास एक नवीन आज्ञा देतो (योहान 13:34)
(स्विझर्लंडमधील जिनिव्हा येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1973 प्रभु, आम्हाला प्रार्थना करायला शिकव. (लूक 11:1)
(स्पेनच्या अॅबे ऑफ मोन्सेरात येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1974 प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे (फिलिपैकरास पत्र 2:1-13)
(स्विझर्लंडमधील जिनिव्हा येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

१९७५ देवाचा उद्देश: ख्रिस्तामध्ये सर्व गोष्टी (इफिसकरास पत्र 1:3-10)
(ऑस्ट्रेलियन गटातील साहित्य – जिनिव्हा, स्विझर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1976 आपण त्याच्यासारखे होऊ (1 योहान 3:2) किंवा, आपण जसे आहोत तसे बनण्यासाठी बोलावले आहे

(कॅरिबियन कॉन्फरन्स ऑफ चर्चचे साहित्य. रोम, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1977 आशेने एकत्र टिकून राहणे (रोमकरास पत्र 5:1-5)
(युद्धाच्या वेळी लेबनॉनमधील साहित्य. जिनिव्हा येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1978 यापुढे अनोळखी नाही (इफिसकरास पत्र 2:13-22)
(इंग्लंडमधील मँचेस्टर मधील वैश्विक गटातील साहित्य)

1979 देवाच्या गौरवासाठी एकमेकांची सेवा करा (1 पेत्र 4:7-11)
(अर्जेंटिनाचे साहित्य – जिनिव्हा, स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1980 तुझे राज्य येवो (मत्तय 6:10)
(जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक, बर्लिनमधील एका वैश्विक गटातील साहित्य-मिलानमध्ये पूर्वतयारी बैठक आयोजित)

1981 एक आत्मा - अनेक कृपादाने - एक शरीर (1 करिंथकरास पत्र12:3b-13)
(ग्रेमूर फादर्स, यूएसए कडून साहित्य – जिनिव्हा, स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1982 हे प्रभू, सर्वजण तुझ्यात त्यांचे घर शोधू दे (स्तोत्रसंहिता 84)
(केनियाचे साहित्य - मिलान, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1983 येशू ख्रिस्त - जगाचे जीवन (1 योहान 1:1-4)
(आयर्लंडमधील एका वैश्विक गटातील साहित्य – सेलिग्नी (बॉसी), स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1984 आमच्या प्रभूच्या वधस्तंभाद्वारे एक होण्यासाठी बोलावले (1 करिंथकरास पत्र 2:2 आणि कलस्सैकरास पत्र १:२०) (वेनिस, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1985 ख्रिस्तासोबत मरणापासून ते जीवनापर्यंत (इफिसकरास पत्र 2:4-7)
(जमैकाचे साहित्य – ग्रँडचॅम्प, स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1986 तुम्ही माझे साक्षी व्हाल (प्रेषितांची कृत्ये 1:6-8)
(युगोस्लाव्हिया (स्लोव्हेनिया) मधील साहित्य - गोस्लाव्हिया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित,)

1987 ख्रिस्तामध्ये संयुक्त - एक नवीन निर्मिती (2 करिंथकरास पत्र 5:17-6:4a)
(इंग्लंडमधील साहित्य - ताईझे, फ्रान्स येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1988 देवाची प्रीति भीती घालवून देते (1 योहान 4:18)
(इटलीचे साहित्य – पिनेरोलो, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1989 समुदाय तयार करणे: ख्रिस्तामध्ये एक शरीर (रोमकरास पत्र 12:5-6अ)
(कॅनडातील साहित्य - व्हेली ब्रिज, इंग्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1990 जेणेकरुन ते सर्व एक व्हावे...जगाने विश्वास ठेवावा (योहान 17)
(स्पेनमधील साहित्य - माद्रिद, स्पेन येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1991 अहो सर्व राष्ट्रांनो परमेश्वराचे स्तवन करा! (स्तोत्रसंहिता ११७ आणि रोमकरास पत्र १५:५-१३)
(जर्मनीतील साहित्य - रोटेनबर्ग एन डर फुलदा, फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1992 मी नेहमी तुझ्यासोबत आहे... म्हणून जा (मत्तय 28:16-20)
(बेल्जियमचे साहित्य - ब्रुग्स, बेल्जियम येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1993 ख्रिस्ती ऐक्यासाठी आत्म्याचे फळ धारण करणे (गलतीकरास पत्र 5:22-23)
(झायरचे साहित्य – झुरिचजवळ, स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1994 देवाचे घराणे: अंतःकरणात आणि मनात एक होण्यासाठी बोलावले (प्रेषितांची कृत्ये 4:23-37)
(आयर्लंडचे साहित्य – डब्लिन, रिपब्लिक ऑफ आयर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1995 कोइनोनिया: देवामध्ये आणि एकमेकांशी संवाद (योहान 15:1-17)
(विश्वास आणि सुव्यवस्थेचे साहित्य – ब्रिस्टल, इंग्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1996 पाहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे (प्रकटीकरण 3:14-22)
(पोर्तुगालचे साहित्य – लिस्बन, पोर्तुगाल येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1997 आम्ही तुम्हाला ख्रिस्ताच्या वतीने विनंती करतो, देवाशी समेट करा (२ करिंथकरास पत्र 5:20)
(नॉर्डिक इक्यूमेनिकल कौन्सिलचे साहित्य – स्टॉकहोम, स्वीडन येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1998 आत्मा आपल्याला आपल्या दुर्बलतेत मदत करतो (रोमकरास पत्र 8:14-27)
(फ्रान्समधील साहित्य – पॅरिस, फ्रान्स येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

1999 तो त्यांचा देव म्हणून त्यांच्याबरोबर राहील, ते त्याचे लोक होतील (प्रकटीकरण 21:1-7)
(मलेशियाचे साहित्य - बोसच्या मठात, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2000 देव धन्य असो ज्याने आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वाद दिला (इफिसकरास पत्र 1:3-14)
(मिडल ईस्ट कौन्सिल ऑफ चर्चचे साहित्य –ला वेर्ना, इटली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2001 मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे (योहान 14:1-6)
(रोमानियामधील साहित्य - वल्कन, रोमानिया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2002 कारण तुझ्याबरोबर जीवनाचा झरा आहे (स्तोत्रसंहिता 36:5-9)
(साहित्य सीईईसी आणि सीईसी - ऑग्सबर्ग जवळ, जर्मनी येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2003 ही आमची संपत्ती मातीच्या भांड्यात आहे (2 करिंथकरास पत्र 4:4-18)
(अर्जेंटिनामधील मटेरियल चर्च - लॉस रुबिओस, स्पेन येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2004 माझी शांती मी तुला देतो (योहान 14:23-31; योहान 14:27)
(अलेप्पो, सीरिया मधील साहित्य - पलेर्मो, सिसिली येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2005 ख्रिस्त, मंडळीचा पाया (1 करिंथकरास पत्र 3:1-23)
(स्लोव्हाकियातील साहित्य - पिएस्टानी, स्लोव्हाकिया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2006 कारण जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने जमले आहेत तेथे त्यांच्यामध्ये मी आहे (मत्तय 18:18-20)
(आयर्लंडचे साहित्य – प्रोस्पेरस कं.किल्डरे, आयर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2007 हा बहिऱ्यांना ऐकण्याची व मुक्यांना बोलण्याची शक्ती देतो (मार्क 7:31-37)
(दक्षिण आफ्रिकेतील साहित्य – फेव्हर्जेस, फ्रान्स येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2008 निरंतर प्रार्थना करा (1 थेस्सलनीकरास पत्र 5:(12a) 13b-18)
(यूएसए मधील सामग्री - ग्रेमूर, गॅरिसन, यूएसए येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2009 तुझ्या हाती ते एकजीव होतील असे कर (यहेज्केल 37:15-28)
(कोरियाचे साहित्य – मार्सेली, फ्रान्स येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2010 तुम्ही या गोष्टींचे साक्षी आहा (लूक 24:48)
(स्कॉटलंडचे साहित्य – ग्लासगो, स्कॉटलंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2011 ते प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासात, भाकर मोडण्यात व प्रार्थना करण्यात तत्पर असत (cf. प्रेषितांची कृत्ये 2:42) (जेरुसलेममधील साहित्य - सैदनाया, सीरिया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2012 आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या विजयाने आपण सर्व बदलू (cf. 1 करिंथकरास पत्र 15:51-58)
(पोलंडचे साहित्य – वॉर्सा, पोलंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2013 देव आपल्याकडून काय अपेक्षा करतो? (cf. मिखा ६:६-८)
(भारतातील साहित्य – बंगळुरू, भारत येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2014 ख्रिस्ताचे विभाजन झाले आहे का? (१ करिंथकरास पत्र १:१-१७)
(कॅनडाचे साहित्य - मॉन्ट्रियल, कॅनडा येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2015 येशू तिला म्हणाला: मला प्यावयाला पाणी दे (योहान 4:7)
(ब्राझीलचे साहित्य – साओ पाउलो, ब्राझील येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2016 प्रभूच्या पराक्रमी कृत्यांची घोषणा करण्यासाठी बोलावले (cf. 1 पेत्र 2:9)
(लॅटव्हियाचे साहित्य - रीगा, लाटविया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2017 समेट-ख्रिस्ताची प्रीती आम्हाला आवरून धरते (2 करिंथकरास पत्र 5:14-20)
(जर्मनीचे साहित्य – विटेनबर्ग,जर्मनी येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2018 हे परमेश्वरा तुझा उजवा हात बळाने प्रतापी झाला आहे (निर्गम 15:6)
(कॅरिबियनमधील साहित्य – नासाऊ,बहामास येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2019 न्याय आणि फक्त न्याय तुम्ही पाठपुरावा कराल (अनुवाद16:18-20)
(इंडोनेशियातील साहित्य – जकार्ता, इंडोनेशिया येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2020 त्यांनी आमच्यावर असामान्य दयाळूपणा दाखवला (प्रेषितांची कृत्ये 28:2)
(माल्टाकडील साहित्य - राबत, माल्टा येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2021 जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो (cf. योहान 15:5-9)
(कम्युनिटी ऑफ ग्रँडचॅम्पचे साहित्य – अरेयुस, स्वित्झर्लंड येथे पूर्वतयारी बैठक आयोजित)

2022 आम्ही पूर्व दिशेस तारा पाहून, त्याला नमन करावयास आलो आहों. (मत्तय 2:2)
(मध्यपूर्व चर्च ऑफ कौन्सिल, लेबनॉनचे साहित्य - पूर्वतयारीची ऑनलाइन बैठक झाली)

# ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताहाच्या इतिहासातील प्रमुख तारखा

| | |
|---|---|
| c 1740 | स्कॉटलंडमध्ये पेन्टेकोस्टल चळवळ उभी राहिली, ज्यामध्ये उत्तर अमेरिकन संबंध होते, ज्यांच्या पुनरुज्जीवन संदेशामध्ये सर्व मंडळयांसाठी आणि सोबत प्रार्थना समाविष्ट होत्या. |
| 1820 | रेव्ह. जेम्स हॅल्डेन स्टीवर्ट यांनी ख्रिस्ती लोकांच्या ऐक्याच्या पवित्र आत्म्याच्या वर्षावासाठी संकेत प्रकाशित केले. |
| 1840 | रेव्ह. इग्नेशियस स्पेन्सर, रोमन कॅथलिक धर्मात धर्मांतरित, "ऐक्यासाठी प्रार्थनेचे संघटन" ते हे सुचवितात. |
| 1867 | अँग्लिकन बिशपची पहिली लॅम्बेथ परिषद त्याच्या ठरावांच्या प्रस्तावनेत ऐक्यासाठी प्रार्थना करण्यावर जोर देते |
| 1894 | पोप लिओ XIII ने पेंटकॉस्टच्या संदर्भामध्ये ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताह च्या सरावाला प्रोत्साहन दिले. |
| 1908 | रेव्ह. पॉल वॉटसन यांनी सुरू केलेल्या "चर्च युनिटी ऑक्टेव्ह" चे पहिले निरीक्षण. |
| 1926 | विश्वास आणि आदेश चळवळीने " ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थनेचा सप्ताह" हे प्रकाशन करून सुरुवात केली. |
| 1935 | फ्रान्सचे अबे पॉल कौटरियर यांनी "ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थनेचा सार्वत्रिक सप्ताह" ची वकिली केली. ख्रिस्त त्याच्या इच्छेने ऐक्य करतो, या प्रार्थनेच्या आधारावर समावेश केला आहे. |
| 1958 | युनिटे क्रेटिएन (ल्योन, फ्रान्स), मंडळयांच्या विश्व परिषदेचा विश्वास आणि आदेश आयोगाने प्रार्थना सप्ताहाच्या साहित्याची सहकारी तयारी केली. |
| 1964 | पोप पॉल VI आणि एथेनागोरस कुळपिता आम्ही सर्वांनी एकत्र व्हावे म्हणून मी येशूची प्रार्थना एकत्र केली. (योहान 17) |
| 1964 | व्हॅटिकन II विश्वव्यापी फर्माणवर जोर देतो की प्रार्थना ही विश्वव्यापी चळवळीचा जीव आहे आणि प्रार्थना सप्ताहचे पालन करण्यास प्रोत्साहित करतो. |
| 1966 | मंडळयांची विश्व परिषदेचा विश्वास आणि आदेश आयोग, आणि ख्रिस्ती ऐक्याच्या प्रचारासाठी सचिवालय (ख्रिस्ती ऐक्याच्या प्रचारासाठी पोंटिफिकल परिषद या नावाने आज ओळखल्या जाते) यांनी प्रार्थना सप्ताह साहित्याची अधिकृत संयुक्तपणे सुरुवात केली. |
| 1968 | ख्रिस्ती ऐक्याच्या प्रचारासाठी सचिवालय आणि विश्वास आणि आदेश आयोग यांनी संयुक्तपणे प्रार्थना सप्ताह साहित्याचा प्रथम अधिकृत उपयोग केला. |
| 1975 | विश्वव्यापी स्थानिक गटाने तयार केलेल्या मसुद्याच्या मजकुरावर आधारित प्रार्थना सप्ताह साहित्याचा पहिला वापर केला. आणि 1975 चा प्रारंभिक मसुदा तयार करण्यासाठी ऑस्ट्रियन गटाने ही योजना सर्वप्रथम हाती घेतली |

1988 ख्रिश्चन फेडरेशन ऑफ मलेशिया च्या उद्घाटनाच्या उपासनेत प्रार्थना सप्ताह साहित्याचा वापर करण्यात आला, जे यांच्या देशांमध्ये प्रमुख गटांना जोडले जाते.

1994 YMCA आणि YWCA मधून 1996 प्रतिनिधीसाठी आंतरराष्ट्रीय गटाने हा मजकूर तयार केलेला आहे.

2004 ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताहाची संसाधने ही विश्वास आणि आदेश आयोग (WCC) आणि ख्रिस्ती ऐक्याच्या प्रचारासाठी पोंटिफिकल परिषदेने (Catholic church) यांनी एकाच स्वरूपात प्रकाशन आणि तयार करावे असा करार झाला.

2008 ख्रिस्ती ऐक्यासाठी प्रार्थना सप्ताहाच्या 100 व्या वर्धापन दिनाचे स्मरण ( पूर्ववर्ती, द चर्च युनिटी ऑक्टेव, प्रथम 1908 मध्ये निरीक्षण करण्यात आले.)

2017 सुधारणाच्या 500 व्या वर्धापन दिनानिमित्त, प्रार्थना सप्ताहाचे साहित्य 2017 एक जर्मन ख्रिस्ती व्यक्तीने तयार केले होते.